रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १४८
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, १४ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## नागपुरात होणार महायुती सरकारमधील नव्या मंत्र्यांचा शपथविधी?



**नागपूर :** राज्यात महायुतीमधील सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांकडून आमदारांच्या गाठीभेटी आणि बैठका होत आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्ताराच्या कार्यक्रमाला वेग आला असून मुंबईऐवजी आता नागपुरात मंत्रिमंडळ विस्तार करण्याचे निश्चित झाल्याचे कळते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भाजपचे २१ मंत्री शपथ घेणार आहेत, तर राष्ट्रवादीचे १० आणि शिवसेनेच्या १२ मंत्र्यांचा शपथविधी होईल. त्यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपदाचादेखील समावेश आहे. विशेष म्हणजे नागपुरात पहिल्यांदाच मंत्र्यांचा शपथविधी होत आहे. मिळालेल्या माहितीप्रमाणे महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार आणि नव्या मंत्र्यांचा शपथविधी नागपुरात रविवारी (दि. १५) दुपारी ३ वाजता होणार असल्याचे समजते. त्या संदर्भात राजभवनात तयारीही सुरू आहे. अर्थात, याबाबत शासनाकडून अधिकृत घोषणा झालेली नाही.

### अंतरंग

सीसीटीएनएस प्रणालीत रायगड पोलिसांचा डंका/२
माथेरानच्या ई-रिक्षा कायमस्वरूपी सुरू ठेवा/५
सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत मुंबईची फायनलमध्ये धडक/८

# राज्याला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकासांच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याने अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता २०२८ ते २०३०पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करू, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




मुंबईच्या वांद्रे बीकेसी येथील जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटरमध्ये १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचा शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ झाला. त्या वेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

उद्घाटन समारंभाला माजी मंत्री तथा आमदार मंगल प्रभात लोढा, वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी.व्ही. मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यांच्यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच, पण भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आणि विविध क्षेत्रातील विकासाच्या तत्वावर आधारित वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. पाश्चिमात्य संस्कृती आणि आपल्या संस्कृतीमध्ये मूलभूत अंतर आहे. पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये जो कोणी सक्षम आहे तोच विकास करू शकतो, मात्र आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक जन्मलेला व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आणि अधिकार आहे.

भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारा भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. जगातील लोक म्हणत होते की, एवढी मोठी लोकसंख्या असलेला देश कशा प्रकारे प्रगती करू शकतो? परंतु देशातील कुशल मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून प्रत्येकाला विकासामध्ये सोबत घेऊन जात आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र आज मोठ्या गतीने पुढे जात आहे. महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी सल्लागार कमिटीची स्थापना केली असून या समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र कोणकोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो याचा अभ्यास करून यावर आधारित महाराष्ट्राच्या विकासाची धोरणे आखली जात आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



## पनवेल मनपा हद्दीतील पाणीपुरवठ्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली पाहणी

### ■ सर्व कामे ३१ मार्चपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांचे पुढील २० वर्षांचे पाण्याचे नियोजन असलेली न्हावा शेवा पाणीपुरवठा योजना टप्पा ३ची आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिका आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह पाणीपुरवठा अधिकाऱ्यांसमवेत शुक्रवारी (दि. १३) पाहणी केली. या वेळी त्यांनी वयाळ ते भोकरपाडा पाईपलाईनच्या सद्यस्थितीत असलेल्या कामाची पाहणी करून या योजनेची सर्व कामे ३१ मार्चच्या आधी पूर्ण करून घ्यावी, असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

न्हावा शेवा पाणीपुरवठा योजना टप्पा ३ या योजनेचे काम प्रगतिपथावर आहे. यामुळे पनवेल महापालिका क्षेत्रात १०० एमएलडी पाणीपुरवठा दुपटीपेक्षा जास्त वाढून २२८ एमएलडी होणार आहे. त्यामुळे पनवेलकरांना हक्काचे पाणी मिळणार असून पुढील २० वर्षांचे सुरळीत पाणीपुरवठ्याचे नियोजन होणार आहे.

पनवेलकरांचा पाणी प्रश्न कायमचा सुटावा म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला आहे. याच संदर्भात शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी न्हावाशेवा पाणीपुरवठा योजना टप्पा ३ या योजनेची पाहणी केली. या योजनेच्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा या वेळी घेण्यात आला. यामध्ये वयाळ ते भोकरपाडा पाईपलाईनचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे याकरिता अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. ३१ मार्चच्या आधी ही सर्व कामे पूर्ण करावी, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांसोबत वयाळ ते भोकरपाडा या पाईपलाईनची पाहणी केली. त्यांच्यासमवेत पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक तथा भाजपचे पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, पाणीपुरवठा अधिकारी विलास चव्हाण, एमजेपीचे मुख्य अभियंता प्रशांत भांबरे, कार्यकारी अभियंता वेंगुर्लेकर, उपअभियंता वायदंडे, जेव्हीपीआरचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## काँग्रेस-शिवसेना उबाठा वाद चव्हाट्यावर!

### संजय राऊतांच्या वक्तव्यावर विजय वडेट्टीवारांचे प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आगामी महापालिकांच्या निवडणुकांसाठी एकला चालो रेचा नारा पुकारला आहे. याबाबतची अधिकृत भूमिका जाहीर झालेली नसली तरीही मुंबई पालिका काबिज करायची असेल तर एकट्याने निवडणूक लढवली पाहिजे, असा सूर या पक्षातील नेत्यांकडून आवळला जातोय. दरम्यान, उबाठा नेते खासदार संजय राऊतांनीही याबाबत भाष्य केले.




मुंबईसह १४ महापालिकांमध्ये निवडणूक जिंकण्याकरिता शिवसेनेने तयारी सुरू केली असल्याचे संजय राऊत शुक्रवारी (दि. १३) म्हणाले. त्यामुळे महाविकास आघाडीतून फुटून शिवसेना स्वतंत्र निवडणूक लढवणार असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यावरून काँग्रेसचे नेते आणि विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राऊतांवर टीका केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, संजय राऊतांच्या देहबोलीतून असं जाणवतंय की त्यांना नैराश्य आलंय. कदाचित या नैराश्येपोटी त्यांनी एकला चलो रे चा नारा दिला असेल, त्यांनी स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला असेल तर तो त्यांचा अधिकार आहे. आघाडी म्हणून आम्ही एकत्र लढण्यास तयार आहोत, पण संजय राऊतांच्या भूमिकेसंदर्भात एकदा स्पष्टता आली की, आम्ही आमचा निर्णय घेऊ.

दरम्यान, कोणाची इच्छा नसेल तर आम्ही नागपुरात स्वबळावर निवडणूक लढवणार, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते विकास ठाकरे यांनी दिली.

## 'पुष्पा' फेम अभिनेता अल्लू अर्जुनला अटक व जामीन



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

'पुष्पा' फेम अभिनेता अल्लू अर्जुनला शुक्रवारी (दि. १३) तेलंगणा पोलिसांनी अटक केली होती. हैदराबाद येथील संध्या थिएटरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी अल्लूला पोलिसांनी ताब्यात घेतले व नामपल्ली कोर्टाने त्याला १४ दिवसांची कोठडी सुनावली होती. तेलंगणा हायकोर्टाने त्याला अंतरिम जामीन मंजूर केला.

हैदराबादमध्ये ४ डिसेंबर रोजी 'पुष्पा २' चित्रपटाच्या प्रीमियरवेळी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये एका ३९ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला होता, तर या महिलेचा मुलगा रुग्णालयात असून त्याची प्रकृती गंभीर आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अल्लू व त्याची टीम या थिएटरमध्ये येणार आहे याबाबत पोलिसांना माहिती नव्हती.

### निवडक

#### अश्विनी भिडे आता मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिवपदी


**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांची बदली झाली आहे. आयएएस अधिकारी भिडे यांची आता मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पुढील आदेशापर्यंत मेट्रोच्या व्यवस्थापकीयपदाचा कार्यभार सांभाळण्याचेही निर्देश त्यांना देण्यात आले आहेत. याआधी मुख्यमंत्री कार्यालयाचा पदभार ब्रिजेश सिंह हे पाहत होते.

#### मुंबईकरांना कोस्टल रोडचे न्यू ईयर गिफ्ट मिळणार!

**मुंबई :** येथील सागरी किनारा मार्गावरील (कोस्टल रोड) हाजी अली ज्यूस सेंटर ते वरळी नाक्यापर्यंतची आंतरबदल मार्गिका क्रमांक २ नुकतीच महापालिकेने सुरू केली. त्यामुळे या रोडवरील हाजी अली ते वांद्रे-वरळी सी लिंकदरम्यानच्या आठपैकी सहा आंतरबदल मार्गिका सुरू झाल्या आहेत. उर्वरित दोन मार्गिकाही लवकरच सुरू करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. कोस्टल रोडचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून येत्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अंतिम टप्पा सेवेत येऊ शकतो.

## तळोजातील आयशा हॉटेलने केले अनधिकृत बांधकाम




### हॉटेलच्या आडून मदरसा; कारवाई करण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह नागरिकांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा फेज १मधील आयशा हॉटेलने जागेची मर्यादा ओलांडत अनधिकृत बांधकाम केले आहे. या अनधिकृत बांधकामामुळे येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे. त्या संदर्भात त्यांनी निवेदनही आयुक्तांना दिले आहे.

पनवेल महापालिका हद्दीतील तळोजा फेज १, सेक्टर २मध्ये असलेल्या आकार रेसिडेन्सीत आयशा नावाने हॉटेल व्यवसाय सुरू आहे. या हॉटेल मालकाने अनधिकृत बांधकाम करून बाहेरील जागेत किचन तसेच फुटपाथवरसुद्धा अनधिकृत काम केले आहे. त्याचबरोबर अवैधपणे स्वच्छतागृह उभारले आहे. येथे नावाला हॉटेल व्यवसाय दाखवला जात असून या जागेचा वापर मदरसा म्हणून करत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत आणि त्याच अनुषगांने अनधिकृत बांधकामासंदर्भातील फोटो तसेच व्हिडीओसुद्धा उपलब्ध झाले आहेत. या संदर्भात तक्रारी करणाऱ्यांना हॉटेल मालकाकडून धमकावण्याचा प्रकारदेखील होत आहे. (पान २ वर..)

## वाशीत आजपासून महालक्ष्मी सरस प्रदर्शन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)च्या वतीने नवी मुंबईत वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर या ठिकाणी १४ ते २५ डिसेंबर या कालावधीत राज्यस्तरीय महालक्ष्मी सरस प्रदर्शन २०२४चे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रूचेश जयवंशी यांनी दिली. ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून संघटित करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी निर्माण केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून व्यवसायवृद्धी व्हावी असा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

महालक्ष्मी सरस

महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे नवी मुंबईतील हे दुसरे वर्ष असून मागील वर्षी या प्रदर्शनाला नवी मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. हे प्रदर्शन एक अत्यंत नावीन्यपूर्ण आणि ग्रामीण संस्कृती शहरापर्यंत पोहचविण्याचे अनोखे व्यासपीठ आहे. या राज्यस्तरीय प्रदर्शनामध्ये साधारण ४७५ स्टॉल आहेत. महाराष्ट्रातील ३७५ आणि देशभरातून साधारण १०० स्टॉल लावण्यात येणार आहेत. प्रदर्शनात राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुगरणींचे खमंग आणि रूचकर शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे ७५ स्टॉलचे मिळून भव्य असे फूड कोर्ट असणार आहे.

या प्रदर्शनात अनेक प्रकारच्या कलाकुसर, हातमागावर तयार केलेले कपडे, वूडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्टच्या वस्तू असणार आहेत. याशिवाय महिलांचे दागिने, लाकडी खेळणी, इतर राज्यातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल पहायला मिळणार आहे.

## मुरूडच्या कोर्लईत रताळे पिकाची लागवड

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई गावात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही रताळे पिकाची लागवड करण्यात आली आहे. अडीच महिन्यांनी महाशिवरात्रीच्या एक आठवडा आधी हे पीक तयार होते.



सुमारे तीन हेक्टर जमिनीवर रताळ्याचे पीक घेतले जाते. रताळे हे आरोग्यवर्धक असून यामध्ये व्हिटॅमिन ए, त्याचप्रमाणे कॅल्शियम, मँगनीज व पोटेशियम असल्याने ते गुणकारक मानले जाते. या पिकाच्या लागवडीसाठी खूप मेहनत घ्यावी लागते. त्यामुळे सर्वच शेतकरी हे पीक घेत नाहीत.कोर्लई गावाची परंपरा आहे की, दरवर्षी महाशिवरात्री वेळेस रताळे पिकाचा पुरवठा या गावातून होत असतो.

रताळे पिकाचा हंगाम ज्या वेळी सुरू होतो तेव्हा निवडक व आकर्षक रताळी राखून ठेवली जातात. ही सर्व रताळी किमान माध्यम तापमानात ठेवावी लागतात. जून महिन्याच्या पहिल्या पावसात राखून ठेवलेल्या या रटाळ्यांना कोंब फुटतो. अशी रताळी पावसाच्या हंगामात जमिनीत पुरली जातात. त्यानंतर काही दिवसांनी यावर वेल वाढते. ती वाढलेली वेल इतर ठिकाणी जमीन भुसभुशीत करून त्यावर गाळे तयार करून जमिनीवर लावली जाते. या वेलीवरून जमिनीच्या खाली रताळी तयार होतात. तयार झालेली रताळी महाशिवरात्रीच्या एक आठवडा आधी काढली जातात.

साधारणतः ही रताळी मुरूडच्या बाजारपेठेत शंभर रुपये किलोंनी विकली जातात. महाशिवरात्रीच्या किमान तीन दिवस अगोदर मुरूड बाजारपेठेत रताळ्यांचा मोठा बाजार भरतो. लोक ही रताळी खरेदी करण्यासाठी येत असतात. या बाजारातून किमान २० टन रताळी विक्री होत असते. स्थानिक लोकांनी पिकवलेल्या या रताळ्यांना बाजारपेठेत अधिक पसंती पहावयास मिळत असल्याने या तीन दिवसांच्या बाजारातून लाखो रुपयांची उलाढाल होत असते. सध्या कोर्लई गावात रताळी लागवड शंभर टक्के पूर्ण झाली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना स्थानिक शेतकरी विन्नीन वेगस व जेरॉन पेय यांनी सांगितले की, सर्व शेतकऱ्यांची रताळी लागवड पूर्ण झाली आहे. सध्या मजुरीचे व खताचे दर खूपच वाढले आहेत. रताळी पीक काढणाऱ्या शेतकऱ्यांना खताच्या दरात सूट मिळावी तसेच कृषी खात्याकडून बामन कोंडी भागात बंधारा बांधून दिल्यास पाणीपुरवठा मुबलक होईल. या बाबींकडे लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



## अखंड हरिनाम सप्ताह

**पनवेल : मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी ते दत्त जयंती मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेपर्यंत गव्हाण शिवाजीनगर येथील श्री समर्थ सद्‌गुरू बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या हरिनाम सप्ताहाला शुक्रवारी सुरुवात झाली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह भरतशेठ ठाकूर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, प्रतिक ठाकूर आदींनी या ठिकाणी भेट देत दर्शन घेतले.**



# सीसीटीएनएस प्रणालीत रायगडचा डंका

## जिल्हा पोलिसांचा राज्यात तिसरा क्रमांक

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी सीसीटीएनएस कार्यप्रणालीत रायगड पोलीस दलाने पुन्हा एकदा चमकदार कामगिरी केली आहे. सलग दुसऱ्या वर्षी सीसीटीएनएस प्रणालीत रायगड पोलीस दलाने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांचा प्रशस्तीपत्र आणि चषक देऊन सन्मानित केले.

पोलीस ठाण्यात दाखल होणार गुन्हे, अटक होणारे गुन्हेगार यांच्यावर अंकुश ठेवण्याकरीता विविध उपाय योजना करण्यात येतात त्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर होतो. सीसीटीएनएस म्हणजेच क्राइम अ‍ॅन्ड क्रिमीनल ट्रॅकींग नेटवर्क सिस्टीम हा पोलीस दलातील महत्वकांक्षी प्रकल्प असुन सर्व संपूर्ण राज्यभरात या प्रणालीचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. ऑन-लाईन कार्यप्रणालीमुळे सर्व पोलीस ठाणी एकत्र जोडली गेली आहेत. पोलीस ठाणेतील सर्व नोंदी व प्रक्रिया ह्या ऑनलाईन घेतल्या जात आहेत. पोलीस ठाण्यात अटक होणाऱ्या गुन्हेगारांच्या नोंदी सदरच्या प्रणालीत होत असल्यामुळे, कोणत्याही पोलीस ठाण्यात कुठल्याही गुन्हेगाराचे नाव सदर प्रणालीत टाकल्यानंतर सदर आरोपीवर यापुर्वी किती गुन्हे दाखल आहेत याची इत्यंभुत माहिती प्राप्त होते. त्यामुळे गुन्हे आणि गुन्हेगारांची कुंडली जुळवण्यात ही प्रणाली अत्यंत प्रभावी ठरत आहे.

रायगड पोलीस दलाने गेल्या काही वर्षात सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. सन २०१८मध्ये रायगड पोलीसांनी राज्यात दुसरा, तर २०२३मध्येही राज्यात तिसरा क्रमांक पटकावला होता. २०२४मध्ये पुन्हा एकदा रायगड जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

पोलीस अधीक्षक, कार्यालय येथे स्थापित सीसीटीएनएस कक्ष व पोलीस ठाण्यात नियुक्त प्रशिक्षीत पोलीस अंमलदार यांनी ही प्रशंसनीय कामगिरी केली आहे. पोलीस ठाणेकडील कामकाजामध्ये या प्रणालीचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करून यापुढेही चांगली कामगिरी करण्याचा मानस रायगड पोलीस दलाने व्यक्त केला आहे.

**रायगड जिल्ह्याने सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. पुढेही सातत्य कायम ठेवत गुन्ह्यांना आळा बसावा व गुन्हेगारांवर वचक निर्माण व्हावा याकरीता दल प्रयत्नशील राहणार आहे.**
**-सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक**

# कातळपाड्यातील तरुणाच्या हत्येप्रकरणी दोघांना अटक

## पैशांच्या व्यवहारावरून झाला होता वाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील कातळपाडा येथील इसमाची गळा दाबून हत्या करण्यात आली. उसने दिलेले पैसे देण्या-घेण्यावरून हा वाद झाला असून या गुन्ह्यातील दोघांना पोलिसांनी गुरुवारी अटक केली आहे. ही घटना कातळपाडा येथे बुधवारी रात्री घडली. या प्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार अमित प्रफुल्ल वाघ (३७, रा. कातळपाडा) याने कोपरी-कुर्डूस येथील व्यक्तींकडून उसने पैसे घेतले होते. ती रक्कम परत दिली नाही. त्याचा राग धरून चंद्रकांत म्हात्रे आणि अक्षय म्हात्रे यांनी अमित वाघ याच्या घरी रात्री जाऊन उसने दिलेल्या पैशाची मागणी केली. त्यावेळी वाघ आणि म्हात्रे यांच्यात शाब्दीक वाद झाला. या नंतर दोघांनी त्याला शिवीगाळी करीत हाताबुक्क्याने व लाथेने मारहाण केली. घरातून बाहेर पडवीमध्ये खेचत आणले. त्यानंतर चंद्रकांतने अमितची मान दाबली. अक्षयने अमितच्या गुप्त भागावर लाथ मारून पुन्हा त्याला मारहाण केली. त्यामध्ये तो गंभीर जखमी झाला. ही घटना कातळपाडा येथे अमित वाघ याच्या घरात रात्री पावणे बाराच्या दरम्यान घडली. झालेल्या दुखापतमध्ये अमितचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर दोघेही पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोयनाड पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने त्यांचा शोध सुरू केला. अखेर गुरुवारी सायंकाळी त्यांना पकडण्यास यश आले. या प्रकरणी खून करणाऱ्या चंद्रकांत म्हात्रे व अक्षय म्हात्रे यांच्याविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या दोघांनाही अटक करण्यात आली आहे.

# लोधिवली ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे सदानंद हंबीर

**चौक : प्रतिनिधी**



लोधिवली ग्रामपंचायतीत उबाठा सेनेकडे बहुमत असतानादेखील उपसरपंच पदावर भाजपचे सदानंद हंबीर यांची निवड झाली. भाजप उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी हा चमत्कार घडविल्याने भविष्यातील राजकीय उलथा पालथ शक्य असल्याचे संकेत मिळाले आहेत.

खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत लोधिवली ही आर्थिक व राजकीय दृष्ट्या सक्षम ग्राम पंचायत आहे. थेट सरपंच पदी उबाठा सेनेने सरपंचासह बहुमत प्राप्त केले होते. उबाठा सेनेने उप सरपंच पद सहा महिन्यासाठी आपल्या सदस्यांना वाटून दिले आहे. त्यामुळे विद्यमान उप सरपंच यांनी राजीनामा दिला. आज सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली उप सरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. उप सरपंच पदा साठी सेनेच्या भारती चाळके,व भाजपचे सदानंद मोहन हंबीर यांनी अर्ज दाखल केला. सरपंच यांच्यासह बारा सदस्य यांनी मतदान केल्यावर सम समान मते मिळाली.त्यामुळे सरपंच यांना असलेल्या जादा मताचा अधिकार वापरला. अंतिम मत मोजणीत भाजपचे सदानंद मोहन हंबिर उप सरपंच पदी निवडून आल्याचे सरपंच पुजा नितीन तवले यांनी जाहीर केले. यावेळी भाजप च्या पदाधिकारी यांनी आनंद साजरा केला.

उपसरपंच सदानंद हांबिर यांचे आमदार महेश बालदी, भाजपचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, चेतन मेश्राम, ग्रामपंचायत चौक सदस्य महादेव पिरकड, भारतीय जनता पक्षाचे नेते प्रदिप गोंधळी,राजेश पिंगले, प्रदीप देशमुख,गुरु जगताप आदींनी अभिनंदन केले.

# सूर्यघर वीज योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महावितरणाकडून प्रधानमंत्री सुर्यंघर मोफत वीज योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावे, असे सर्वत्र आवाहन होत आहे.

वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत गुरुवारी (दि.१२) या योजनेची माहिती देण्यासाठी महावितरण पनवेल ग्रामीण उपकार्यकारी अभियंता राख साहेब, गुण नियंत्रण विभागाचे सहाय्यक अभियंता प्रविण म्हात्रे, मोहोपाडा विजवितरण सहाय्यक अभियंता लक्ष्मीकांत गलांडे यांनी उपस्थित राहून ग्रामसभेत प्रधानमंत्री सुर्यधर मोफत वीज योजना वापराबाबत माहिती देत सदर योजना नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी वासांबे ग्रामपंचायतीकडून जनजागृती व्हावी असे आवाहन केले.



या वेळी सरपंच उमा संदिप मुंढे, उपसरपंच भुषण पारंगे, ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील, सर्व ग्रामपचायत सदस्य, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. हि योजना महावितरणाच्या घरगुती असून छतावरील सौर उर्जा दरमहा निर्मितीत एक किलो वॅटमध्ये १२० युनिट निर्मिती होते. यासाठी ५००० लोकसंख्या असलेल्या गावांना एक कोटी रुपयांचे केंद्रीय अर्थसहाय्य अनुदान मिळणार आहे.

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज बील योजना हि एक सौर उर्जा यंत्रणा आहे. जी नागरिकांना त्यांच्या घरावर सौर पॅनल लावण्यात आणि स्वताची वीज निर्माण करण्याची संधी देते.या योजनेचे मुख्य उद्दीष्ट म्हणजे विज बिल शुन्य आणि अतिरीक्त विज विकून उत्पन्न मिळविता येते.

# सोन्याची चेन खेचून दोघे पसार

**पनवेल : वार्ताहर**

शतपावली करण्यासाठी पतीसह बाहेर पडलेल्या महिलेच्या गळ्यातील दिड लाख रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून मोटार सायकलीवरुन आलेले दोघेजण पसार झाल्याची घटना खांदा वसाहतीमध्ये घडली आहे.

खांदा वसाहत सेक्टर १३ येथे राहणारे विश्वास खैरनार हे रात्रीचे जेवण करून पत्नीसह शतपावली करण्यासाठी घराबाहेर पडले होते. सेक्टर ९ जवळील सिडको गार्डनजवळून जात असताना मोटार सायकलवरुन आलेल्या दोघा अज्ञातांपैकी एकाने त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील दिड लाखाची चेन खेचून ते पसार झाले. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सीकेटी कॉलेजमध्ये पदवीधरांसाठी करिअरच्या संधी सत्र यशस्वी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे प्लेसमेंट सेल, इंग्रजी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १२) राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजनेंतर्गत पदवीधरांसाठी करिअरच्या संधी या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील १५ महाविद्यालायांतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.



या कार्यक्रमात बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग सहाय्यक संचालक आणि सहाय्यक केंद्रीय प्रशिक्षणार्थी सल्लागार डॉ. प्रवीण उके यांनी इंटर्नशिपमध्ये उपलब्ध संधी व त्याचे विद्यार्थ्यांना होणारे फायदे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना एनएटीएसच्या पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले. प्राचार्य प्रो.डॉ. एस.के. पाटील यांनी महाविद्यालयात होत असलेल्या करिअर संबंधित कार्यक्रमांबद्दल आणि इतर विद्यार्थीभिमुख कार्यक्रमाबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमास महाराष्ट्र स्किल इंडिया फाउंडेशनचे प्रमुख बिकास साहू, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ. बी.डी. आघाव यांची उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. आर.व्ही. येवले, प्लेसमेन्ट सेलचे चेअरमन सत्यजित कांबळे, ट्रेनिंग आणि प्लेसमेन्ट ऑफिसर प्रा. आरती कागवाडे यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. आर.व्ही. येवले, तर आभार प्लेसमेन्ट ऑफिसर आरती कागवाडे यांनी मानले. पाहुण्यांचे स्वागत प्लेसमेन्ट सेलचे चेअरमन प्रा. सत्यजित कांबळे यांनी केले.

# उरणच्या पाणथळींना पक्ष्यांची प्रतीक्षा

**उरण : प्रतिनिधी**

विविध जातीच्या हजारो पक्षाचे खासकरून फ्लेमिंगोचे उरण हे एक ठिकाण महत्त्वाचे आहे. साधारणपणे ऑक्टोबर अखेरपर्यंत हे पक्षी येथील पाणथळीवर दाखल होतात, मात्र यावर्षी त्यांच्या अगमनाला तब्बल दीड महिना उशीर झाला असल्याची माहिती पर्यावरणवाद्यानी दिली आहे.

उरणच्या जेएनपीटी बंदर परिसर पाणजे, फुंडे, जासई, करळ आदी भागातील पाणथळीवर दरवर्षी हजारोंच्या संख्येने पक्षी येतात.हे पक्षी पाहून त्यांचे निरीक्षण करण्यासाठी शेकडो पक्षी प्रेमी या भागात येतात. याचे मुख्य कारण म्हणजे येथील खाडीत मिळणारे या पक्षांचे अन्न आहे. अनेक वर्षांपासून हा परिसरात हे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करीत येत आहेत, मात्र अनेक कारणांनी उरणच्या पाणथळ जागा हळूहळू नष्ट होऊ लागल्याने या ठिकाणी येणाऱ्या पक्षांची संख्या कमी होऊ लागली आहे. ही संख्या कमी होऊ नये येथील पाणथळ जागा टीकाव्यात यासाठी पर्यावरणवादी सातत्याने प्रयत्नशील आहेत. याकरिता न्यायालयीन लढाई ही ते लढत आहेत. या पाणथळीचे संवर्धन आणि संरक्षण व्हावे यासाठी ही लढाई सुरू आहे.

उरण आणि नवी मुंबई मध्ये येणारे पक्षी हे यावर्षी तब्बल दीड महिना झाला तरी आलेले नाहीत. ते सैबेरिया या देशातून येत असले तरी यातील हजारो पक्षी हे गुजरात मधील कच्छ प्रांतात वास्तव्यास आहेत. या परिसरातील पाणथळी वर पाणी साठा उपलब्ध असावा त्यामुळे त्यांचे आगमन लांबले असावे असे मत ज्येष्ठ पर्यावरणवादी बी. एन. कुमार यांनी व्यक्त केले आहे.

# होंडा सिटी गाडीची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**पनवेल :** होंडा सिटी गाडीची दुचाकीस धडक बसल्याने झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोन जण जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील गाढेश्वर मंदिराजवळ घडली आहे. संजय निरगुडा (३४) व त्यांचा मित्र गौरव भवर हे त्यांच्या ताब्यातील बजाज डिस्कव्हर कंपनीची दुचाकी घेवून गाढेश्वर मंदिराजवळून जात असताना समोरुन आलेल्या होंडा सिटीवरील चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने त्याने त्यांच्या मोटार सायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात संजय निरगुडा व गौरव भवर जखमी झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## तळोजातील आयशा हॉटेलने केले अनधिकृत बांधकाम

या प्रकरणी चौकशी करून तत्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिकेकडे केली आहे.

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ३च्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या या आयशा हॉटेलच्या ठिकाणी विटांचे बांधकाम व पत्र्याचे शेड असे जवळपास २०८८ चौरस फूट सर्रासपणे अनधिकृत बांधकाम केल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे या हॉटेलच्या आडून मदरसा चालत असल्याचा धक्कादायक प्रकार व्हिडीओतून समोर आला आहे. हॉटेलचा चेहरा समोर करत मागील बाजूने मदरशासारखे प्रकार घडत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. त्यामुळे याबाबत कडक कारवाईची मागणी नागरिकांकडूनही होत आहे.



# हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मरणार्थ स्वदेशी दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वावलंबी भारत अभियानाच्या अंतर्गत स्वदेशी जागरण मंच आणि विविध शाळा, महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमानाने महान हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मरणार्थ स्वदेशी दिन साजरा करण्यात आला.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मृती आणि बलिदानाचा सन्मान करण्यासाठी एक प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या योगदानावर चर्चा, तरुण पिढीमध्ये स्वदेशीबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि राष्ट्राप्रती त्यांनी केलेल्या समर्पणाबद्दल जनजागृती हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमात प्रख्यात व्यक्तींची भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि बाबू गेनूचे धैर्य, भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी असलेली त्यांची अविरत तळमळ ठळकपणे मांडणाऱ्या चर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या. उपस्थितांनी हुतात्मा बाबू गेनूंच्या निस्वार्थ सेवेबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करत अशा राष्ट्रीय वीरांचे स्मरण करण्याचे महत्त्व पटवून दिले.

# खारघरमध्ये बँकेतून रोख रक्कम नेणाऱ्यांना लूटले; दोन घटना

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील बँकेतून रोख रक्कम घेऊन घरी जाणाऱ्या ग्राहकांना लुटण्याच्या दोन घटना महिन्याभरात घडल्या. यामुळे चोरट्यांनी बँक ग्राहकांना लक्ष्य केल्याची चर्चा परिसरात आहे.

पहिली घटना १३ नोव्हेंबरला घडली. यामध्ये सेक्टर १२ येथील कॅनरा बँकेतून ६९ वर्षीय वृद्ध दोन लाख रुपये घेऊन पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी रकमेची पिशवी हिसकावून तेथून पोबारा केला होता.

दुसरी घटना मंगळवारी दुपारी १२ वाजता घडली. सेक्टर ११ येथील साईशास्त्र सोसायटीत राहणारे ७२ वर्षीय वृद्ध सेक्टर १२ येथील स्टेट बँकेतून दोन लाख ३० हजार रुपयांची रक्कम घेऊन ते राहत असलेल्या इमारतीमध्ये प्रवेश करत असताना ३० ते ३५ वयोगटाचे दोन तरुण दुचाकीवर त्यांच्याजवळ आले. चोरट्यांनी पीडित वृद्धाच्या डोळ्यांवर फटका मारुन त्यांना जमिनीवर पाडले आणि रोख रकमेची पिशवी पळविली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे सांगटोली, ता. पनवेल, जि. रायगड. येथील खालील व्यक्तीचे नावे असलेले ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची शेत जमिन आमचे आशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. सांगटोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ. क्र. | कब्जेदाराचे/ मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शशिकांत धर्मा फडके | १९ | ० | ०-५३-१०<br>पो.ख.०-०६-३०<br>**एकूण ०-५९-४०**<br>**सदर जमिनी पैकी २० गुंठे जमीन** | ११.०६ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात अगर सक्षम येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यावहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण:- पनवेल
दिनाक :- १४/१२/२०२४

**सही/-**
**अ‍ॅड. समिर राम कुंभार**
(अ‍ॅडव्होकेट-हायकोर्ट )
मु. पालेखुर्द, पो. देवीचापाडा, ता. पनवेल,
जि. रायगड ४१०२०८. मो. ९००४४०२३३०

## पनवेल महानगरपालिका राबविणार कुष्ठरोग सुरक्षित

# महाराष्ट्र कुसूम अभियान

**पनवेल,रामप्रहर व्रुत्त :**
शाश्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत केंद्र शासनाने सन २०२७पर्यंत शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दीष्ठ निश्चित केले आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील सर्व लपलेले कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्याकरिता आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १६ ते २० डिसेंबर कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र 'कुसूम' अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जाणार आहे.

या विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित राहणाऱ्या, दुर्लक्षित राहणाऱ्या गटांवर उदा. वीटभट्टी कामगार, खाण कामगार, स्थलांतरित व्यक्ती, बांधकाम मजुर, निवासी,आश्रमशाळेत राहणारे विदयार्थी, कंपनीत काम करणारे कामगार इ. वर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या गटातील लोक हे कामाकरिता ,मजुरीकरिता लवकर घर सोडतात व उशिरा घरी परत येतात. यामुळे अशा व्यक्तींची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोध मोहिमेमध्येही होत नाही. ही बाब लक्षात घेवून या घटकांसाठी कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) राज्यात राबविण्यात येत आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात तळोजा कारागृह, खाणी, बांधकामाच्या साईटस्, निवासी आश्रमशाळा अशा विविध ठिकाणी त्वचारोग तज्ज्ञ, आशा वर्कर, बहुद्देशीय कर्मचारी यांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. आनंद गोसावी यांनी दिली.

### यांचे होणार सर्वेक्षण

आश्रमशाळा व वसतिगृहातील विदयार्थी, वीटभट्टी कामगार, खाणकामगार, कारागृहातील व्यक्ती, विविध कारणांमुळे स्थलांतरित झालेल्या व्यक्ती या व्यतिरिक्त नियमित तपासणीमध्ये वंचित राहिलेले घटक या सर्वांचे या मोहिमेंतर्गत सर्वेक्षण केले जाणार आहे.

### कुष्ठरोगाची लक्षणे

शरीराच्या कुठल्याही भागावर फिक्कट लालसर, न खाजणारा बधीर चट्टा/ डाग, त्या ठिकाणी घाम न येणे; जाड, बधीर, तेलकट चकाकणारी त्वचा; त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे; त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे; भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्ण बंद करता न येणे; हातातून वस्तू गळून पडणे, चालतांना पायातून चप्पल निसटणे; हाताची व पायाची बोटे वाकडी असणे, हात मनगटापासून, पाय घोट्यापासून लुळा पडणे.

✻ वरीलपैकी कोणतीही लक्षण असल्यास मोहिमेदरम्यान येणाऱ्या शोध पथकाद्वारे तपासणी करुन घ्यावी अथवा जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याची मनोज भुजबळ यांची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**
रायगड जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक संघटनां सार्वजनिक हिताच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाटी आंदोलन करीत असतात. त्या वेळी दाखल झालेले खटले शासनाने मागे घेण्याची मागणी भाजपच्या ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली आहे.



राज्य शासनाने राजकीय व सामाजिक आंदोलनात ३१ जानेवारी २०२४पर्यंत न्यायालयात दोषारोप दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय ३१ जुलै रोजी घेतला होता. त्यामध्ये सुधारणा करुन ३१ ऑगस्टपर्यन्त दोषरोप पत्र दाखल होतील असे खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला .

तथापी रायगड जिल्ह्यात ओबीसी समाज व सामान्यांचे हक्क संरक्षित करण्यासाथी भाजप ओबीसी मोर्चा तर्फे आमदार योगेश टिळेकर तसेच विद्यमान प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांच्या नेत्रुत्वाखाली राज्यात आंदोलने केली गेली. या वेळी राजकिय व सामाजिक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे नवी मुंबइ विमानतळाला लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत झालेल्या आंदोलनातील कार्यकर्त्यांविरुध्दही गुन्हे दाखल आहेत.

अशा प्रकारे राज्यात तरुण-तरुणी, महिला व पुरुषांवर अनेक खटले दाखल केलेले आहेत.त्यामुळे पोलिस स्टेशन व न्यायालयांमध्ये कामाचा ताण वाधला आहे, तो कमी करण्यासाठी आपण लक्ष घालुन वेळोवेळी काढलेल्या निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन प्रकरणे योग्य त्या कमिटी कडुन का काढली जात नाहीत याची चौकक्षी करुन योग्य ते आदेश द्यावेत अशी मागणी अ‍ॅड. भुजबळ यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्र्याकडे केली आहे.

## वाकडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपच्या प्रभावती खुटले बिनविरोध

### तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
पनवेल तालुक्यातील वाकडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी शुक्रवारी (दि. १३) निवडणूक प्रक्रिया नियोजित होती, परंतु या निवडणुकीमध्ये विरोधकांकडून कोणताही अर्ज दाखल न झाल्याने भारतीय जनता पक्षाच्या ग्रामपंचायत सदस्य प्रभावती खुटले यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली.



भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील यांनी नवनिर्वाचित उपसरपंच प्रभावती खुटले यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी वाकडी ग्रामपंचायत सरपंच कुंदा पवार, माजी सरपंच नरेश पाटील, माजी सरपंच विलास चोरघे, नामदेव जमदाडे, ग्रामपंचायत सदस्य अरुण पाटील, मंगेश पाटील, नीता पाटील, रेणुका जमदाडे, शशिकांत खुटले, संतोष पाटील, जनार्दन पाटील, बाळू पवार, गणेश खुटले, चंद्रकांत म्हात्रे, बाळाराम पाटील, इशाक शेख, योगेश म्हात्रे, लहू वाघ, गणेश पाटील, धनंजय पाटील, यशवंत खुटले, प्रल्हाद खुटले, रामदास खुटले, बळीराम चिखलीकर यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एनएमएमटी बसच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**
एनएमएमटी बसची एका ७० वर्षीय महिलेला धडक बसल्याने झालेल्या अपघातात या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील बारवई गावाजवळ घडली आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

यमुना पवार (७०) या कीर्तन आटोपून घरी येत असताना बारवई गावालगतचा रस्ता ओलांडत असताना भरधाव एनएमएमटी बसने त्यांना धडक दिली. या धडकेत त्या गंभीररित्या जखमी होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पोलिसांनी केली आहे.








**पनवेल : भाजप तालुका सरचिटणीस तथा पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेवक अजय बहिरा, विकास घरत, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी उपसरपंच योगेश लहाने, महेंद्र गोजे, स्वप्नील ठाकूर, के.सी. पाटील, अभय केणी, यतीन पाटील, मयूर कदम यांच्यासह मान्यवरांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

## उरण तालुक्यात पशुगणनेच्या कामाला वेग

**उरण : प्रतिनिधी ,वार्ताहर**
पशुसंवर्धन विभागामार्फत प्रत्येक पाच वर्षांनी पशुगणना करण्यात येते. शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार उरण तालुक्यात २५ नोव्हेंबर पासून पशुगणनेला सुरुवात करण्यात आली आहे. तालुक्यात ६५ गावे व शहरी भागातील १७ वार्ड असुन त्यापैकी १५ गावांमध्ये पशुगणना सुरु आहे. पशुगणनेसाठी पाच प्रगणक नियुक्त असून देखरेख व नियंत्रणासाठी पर्यवेक्षक आहे.



पशुगणनेच्या या मोहिमेत गाय वर्ग, म्हैस वर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह यांच्यासह बदक, कुक्कुट या पक्षांची तसेच पशुधन क्षेत्रासाठी वापरली जाणारी उपकरणे यांची गणना केली जाणार आहे. सदर गणना २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत केली जाणार आहे. पशुगणना अँड्रॉइड मोबाईलमध्ये २१ लेसस्टॉक सेंसूस या अ‍ॅपद्वारे ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे. पशुगननेमुळे पशुधनाची आकडेवारी स्पष्ठ होते व त्यानुसार शासनाकडून धोरण व योजना आखल्या जातात.

विविध योजनांसाठी निधी उपलब्ध केला जातो. तालुक्यात पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे त्यानुसार जनावरांची औषधे व लसी शासनाकडून पुरवल्या जातात. त्यामुळे आपल्याकडील पशूंची खरी माहिती पशुपालकांनी प्रगणकांना द्यावी असे आवाहन तालुका पशुगणना सनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार उद्धव कदम व पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ सोमनाथ भोजने यांनी केले आहे. तालुक्यातील पशुगणना रायगड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## सोनसाखळ्या चोरणारा ताब्यात

### गुन्हे शाखा कक्ष २चा सापळा यशस्वी

**पनवेल : वार्ताहर**
सोन्याच्या दोन चेन चोरी केल्याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २च्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले आहे.

फिर्यादी हे सुनील देशी बारजवळील कट्ट्यावर झोपले असताना अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील तीन तोळे वजनाची ज्याची किंमत एक लाख २० हजार रुपये इतकी असलेल्या सोन्याची दोन चैनी चोरुन नेल्याची तक्रार करण्यात आली होती.

या तक्रारीच्या आधारे समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वपोनि उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण फडतरे, अजित कानगुडे, पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, प्रसाद देसाई, मानसिंग पाटील, हवा.रमेश शिंदे, अनिल पाटील, प्रशांत काटकर, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, रणजित पाटील, निलेश पाटील, दिपक डोंगरे, इंद्रजीत कानू, रुपेश पाटील, सागर रसाळ, अजित पाटील, पो.ना.अजिनाथ फुंदे, पो.शि.विक्रांत माळी, लवकुश शिंगाडे आदींचे पथक गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे केला.

या वेळी आरोपी हा नेरूळ परिसरात थांबला असल्याची माहिती मिळताच पथकाने सापळा रचून आरोपी शेखर हटकर (२६ रा. नेरूळ) याला ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्यातील चोरलेल्या दोन चैनी या पथकाकडे सुपूर्द केल्या आहेत.

## हिंदी भाषा निबंध स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थिनींची बाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
इंडियन वूमन सायंटिस्ट असोसिएशन आणि पिरोजशा गोदरेज फाउंडेशन लायब्ररी, वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निबंध स्पर्धेमध्ये नवीन पनवेलमधील सीकेटी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे. इयत्ता नववी ते बारावीच्या गटामध्ये सप्टेंबर महिन्यात पार पडलेल्या हिंदी भाषा का संरक्षण एवं संवर्धन या विषयावर आयोजित निबंध स्पर्धेमध्ये सदर विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.




या स्पर्धेमध्ये आपल्या विद्यालयातून एकूण १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता यापैकी तीन विद्यार्थिनींनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केले. सावनी सचिन म्हात्रे (इयत्ता दहावी) प्रथम क्रमांक, केसर संतोष गुजरात (इयत्ता नववी) द्वितीय क्रमांक, दिशा अविनाश डोंगरे (इयत्ता नववी) तृतीय क्रमांक तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले.

या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातील हिंदी भाषा विभाग प्रमुख शशिकला पाटील मॅडम आणि सर्व हिंदी विषय शिक्षक यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींचे विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय संतोष चव्हाण आणि पर्यवेक्षिका निरजा मॅडम यांनी कौतुक केले.

या विद्यार्थ्यांनीचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्यावसायिक कोडे स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर आणि विज्ञान महाविद्यालयात ११ डिसेंबर रोजी उद्योजकता डेव्हलपमेंट सेलच्या वतीने व्यवसायिक कोडे स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना भविष्यामध्ये स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी लागणारी कौशल्ये सादरीकरण स्किल या माध्यमातून शिकता यावीत हा होता.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. तनुजा सुमन यांनी केले तसेच उद्योजकता विकास कक्ष इतर सदस्यांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.





**पनवेल : मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी ते दत्त जयंती मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेपर्यंत शिवाजीनगर येथील श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या हरिनाम सप्ताहाला शकुंतला ठाकूर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत तसेच वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले.**

## भाजप भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांच्या वाढदिवसानिमित्त रोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
भाजपचे भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष बबन बारगजे यांचा १५ डिसेंबर रोजी वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे

कळंबोली येथील आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय येथे रविवारी (दि.१५) सकाळी १०.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे भव्य रोजगार मेळावा होईल. इयत्ता बारावी उत्तीर्ण व पदवीधारक मुला-मुलींसाठी बँकिंग व फायनान्स क्षेत्रामध्ये आपले करिअर घडवण्यासाठी सुवर्णसंधी चालून आलेली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने सेग फाउंडेशन व जय गोपीनाथ प्रतिष्ठान यांच्या वतीने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

पनवेल तालुक्यातील व कळंबोलीमधील इच्छुक युवक युवतींनी या मेळाव्याचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन बबन बारगजे यांनी केले आहे. या संबंधी माहितीसाठी अंकुश ढोबळे संपर्क क्रमांक ९९३०९८४००० यांच्याशी संपर्क करावा. कळंबोली येथील सेक्टर ८ मधील जनसंपर्क कार्यालयामध्ये या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# अविचल जिद्द!

भारतीय बुद्धिबळपटू गुकेश दोम्माराजूने सिंगापूर येथील जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत गुरुवारी इतिहास रचला. वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी बुद्धिबळ स्पर्धेतील आजवरचा सर्वात युवा जगज्ज्ञेता बनण्याचा मान त्याने पटकावला. अपयशावर मात करण्याची जिद्द हे अस्सल आणि गुणी क्रीडापटूचे अत्यंत महत्त्वाचे लक्षण मानले जाते. गुकेशचीही नेमकी हीच जमेची बाजू ठरली आहे.

**वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वात युवा जगज्ज्ञेता बनण्याचा मान पटकावलेल्या दोम्माराजू गुकेश म्हणजेच डी. गुकेशचे बालपण सर्वसाधारण दाक्षिणात्य कुटुंबात असते तसेच पार पडत होते. पण बाकीची मुले क्रिकेटसाठी बोलावत असताना गुकेशला मात्र वयाच्या सातव्या वर्षापासूनच बुद्धिबळाने झपाटले. नाक–कान–घसा तज्ज्ञ असलेले वडील आणि मायक्रोबायोलॉजिस्ट आई अशा उच्चशिक्षणाची पार्श्वभूमी असलेल्या पालकांनी त्याच्या या आवडीला सुरुवातीपासूनच प्रोत्साहन दिले. नवव्या वर्षी आशियाई स्पर्धेत अजिंक्यपद मिळवून गुकेशने त्याच्यात काहीतरी वेगळे असल्याची चुणूक दाखवली. झपाट्याने प्रगती करत वयाच्या अकराव्या वर्षी तो 'इंटरनॅशनल मास्टर' झाला. आणि तेव्हाच त्याने 'आता मला लवकरच ग्रँडमास्टर झाले पाहिजे' अशी इच्छा बोलून दाखवली. पण जगाचे त्याच्याकडे लक्ष गेले ते २०२२ साली चेन्नईतील बुद्धिबळ ऑलिम्पिडमध्ये. तसे तर भारतीय बुद्धिबळपटूंच्या क्रमवारीतही तो सर्वोच्च स्थानी नव्हता. पाच वेळा जगज्ज्ञेता राहिलेला विश्वनाथन आनंद, प्रज्ञानंद, विदित गुजराथी आणि अर्जुन इरिगेसी यांच्यानंतर गुकेशचा क्रमांक होता. पण गुकेशने आपला आदर्श आणि गुरू विश्वनाथन आनंदच्या पावलावर पाऊल ठेवत भारताचा दुसरा जगज्ज्ञेता ठरण्याची अलौकिक कामगिरी केली. गुकेशचे जगज्ज्ञेतेपद ही भारतीय बुद्धिबळासाठी खूप मोठी गोष्ट आहे. त्यात त्याचे अवघे १८ वर्षे वय या विजयाला अधिक खास करते. गॅरी कास्पारोव्हने २२व्या वर्षी जगज्ज्ञेतेपद मिळवले. त्याचा हा विक्रम असा मोडला जाईल हे कुणाच्या ध्यानीमनीही नव्हते. कास्पारोव्हचा विक्रम तब्बल ३९ वर्षे अबाधित राहिला. गुकेशने १८ व्या वर्षी मिळवलेले जगज्ज्ञेतेपद म्हणूनच खास ठरते. इतक्या कमी वयात बुद्धिबळाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचणे ही अवर्णनीय कामगिरी आहे. चीनच्या बुद्धिबळातील वर्चस्वाला गुकेशने बुडापेस्टच्या ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक मिळवून हादरवले होते. पण अननुभवी भासणाऱ्या गुकेशकडून चीनचे जगज्ज्ञेतेपद हिरावून घेतले जाईल अशी अपेक्षा कुणालाच नव्हती. बुद्धिबळाच्या या प्रकारातील जागतिक क्रमवारीत ४६ व्या स्थानावर असणारा गुकेश क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असणाऱ्या डिंगसमोर किती टिकाव धरेल याची कोणालाच खात्री नव्हती. पण गुकेशने आपले वेगळेपण सिद्ध करीत इतिहास रचला. या निर्णायक खेळाची पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. डिंगने गेल्या वर्षी इयन नेपोम्नियाशीला पराभूत करत जगज्ज्ञेतेपद मिळवले खरे, पण त्यानंतर त्याचा खेळ खालावला. त्याला नैराश्याने ग्रासले होते. यंदाची लढत सुरू होण्यापूर्वीच त्याला गुकेशकडून पराभव होण्याची भीती वाटू लागली. पण जगज्ज्ञेतेपदाच्या लढतीला सुरूवात झाल्यानंतर मात्र डिंगने कडवा प्रतिकार केलाच. अर्थातच त्याने गुकेशला प्रत्येक डावात झुंजवले. मात्र निर्णायक १४ व्या पारंपरिक डावात डिंगकडून घोडचूक झाली आणि गुकेशने याचा पुरेपूर फायदा घेत विजय संपादन केला. सहाव्या इयत्तेपासून शालेय शिक्षणातून बाहेर पडून बुद्धिबळावर लक्ष केंद्रित करणाऱ्या गुकेशच्या वाटचालीतील त्याच्या पालकांचे योगदान, त्यांचा त्याग व प्रोत्साहन सर्वाधिक लक्षात घेतले गेले पाहिजे.**

# दत्त जयंती माहिती आणि दत्त जन्मकथा



मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्तगुरूंचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी श्री दत्त जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांमध्ये साजरा होत असतो. पूर्वीच्या काळी भूतलावर स्थूल व सूक्ष्म रूपांत आसुरी शक्ती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या. त्यांना दैत्य म्हटले जात असे. देवगणांनी त्या आसुरी शक्तींना नष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न असफल झाले. तेव्हा ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रूपांत दत्त देवतेला अवतार घ्यावा लागला. त्यानंतर दैत्य नष्ट झाले. तो दिवस ऋदत्तजयंती म्हणून साजरा करतात.

दत्त जयंतीला दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी श्री दत्ताची मनोभावे उपासना केल्यास दत्ततत्त्वाचा जास्तीतजास्त लाभ मिळण्यास मदत होते. दत्तजयंती साजरी करण्यासंबंधाने शास्त्रोक्त असा विशिष्ट विधी आढळून येत नाही. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्र सप्ताह असे म्हणतात. दत्त मंदिरामध्ये भजन, कीर्तनादी कार्यक्रम आयोजीत केले जातात. दत्तगुरूंची पूजा, धूप, दीप व आरती करून सुंठवड्याचा प्रसाद वाटप करतात. दत्तांच्या हातातील कमंडलू व जपमाळ ब्रह्मदेवाचे प्रतीक आहे. शंख व चक्र विष्णूचे आणि त्रिशूळ व डमरू शंकराचे प्रतीक आहे. महाराष्ट्रात औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवाला विशेष महत्त्व असते.

श्री दत्तात्रय दैवत आगळे, दत्तजन्म कथा दत्तात्रेय हा शब्द 'दत्त' व 'आत्रेय' अशा दोन शब्दांनी बनला आहे. 'दत्त' या शब्दाचा अर्थ आपण ब्रह्मच आहोत, मुक्तच आहोत, आत्माच आहोत, अशी निर्गुणाची अनुभूती ज्याला आहे असा आणि 'अत्रेय' म्हणजे अत्री ऋषींचा मुलगा. श्री दत्तात्रेयांच्या जन्माविषयी विविध कथा प्रचलित आहेत, परंतु या सगळ्या कथांमधून श्रीदत्त हे अत्रीऋषी व माता अनुसूया यांचा पुत्र व विष्णूचा अवतार आहे, असाच बोध होतो.

अत्रीऋषींनी पुत्रप्राप्तीसाठी ऋक्ष कुलपर्वतावर घोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपाने सारे त्रिभुवन पोळून निघाले. अत्रीऋषींच्या या प्रखर तपाने संतुष्ट होऊन ब्रह्मा–विष्णू–महेश हे तिन्ही देव प्रकट झाले आणि त्यांनी अत्रीऋषींना तपाचे कारण विचारले. अत्रीऋषींनी त्यांना विनवले की, आपण माझ्या उदरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा. तिन्ही देवांनी त्यांची विनंती मान्य केली. देवत्रयीच्या आशीर्वादाने अनुक्रमे ब्रह्मापासून सोम म्हणजे चंद्र, विष्णूपासून दत्त आणि शिवापासून दुर्वास हे तीन पुत्र अनुसयेच्या उदरी जन्मला आली.

श्री दत्तजन्माची एक कथा ब्राह्मणपुराणात आहे. अत्रीऋषींनी ब्रह्मा–विष्णू–महेश यांची पुत्रप्राप्तीसाठी आराधना केली. ते संतुष्ट झाल्यावर त्यांनी देवांना विनवले की, आपण माझ्या घरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा आणि मला एक रूपवती कन्याही प्राप्त व्हावी. देवांच्या आशीर्वादाने दत्रात्रेय, सोम, दुर्वास हे तीन पुत्र आणि शुभात्रेयी नावाची कन्या अत्रीऋषींना प्राप्त झाली.

याचबरोबर दत्तात्रेयांच्या जन्माची आणखी एक कथा प्रसिद्ध आहे. ती अशी की, राहूने सूर्याला ग्रस्त केले असता सर्व पृथ्वी अंध:कारमय झाली. अत्रीने सूर्याला राहूच्या मगरमिठीतून सोडवले आणि पुन्हा पृथ्वी प्रकाशमान केली. अत्रीच्या या महत्कार्यामुळे संतुष्ट झालेल्या शिव व विष्णू यांनी अनुक्रमे दुर्वास आणि दत्त यांच्या रूपाने अत्रीच्या घरी जन्म घेतला.

भारतात शैव, वैष्णव आणि शाक्त हे तीन प्रमुख पंथ आहेत. ती सुमारे हजार ते बाराशे वर्षांपासून श्री दत्तात्रयाची उपासना करत आहेत. संपूर्ण भारतात विशेषत: महाराष्ट्रात श्री दत्त आराधनेची उज्ज्वल परंपरा आहे. महानुभाव संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय व दत्त संप्रदाय ही पाच संप्रदाय श्री दत्तप्रभूची उपासना करताना दिसतात.

श्री दत्त संप्रदायातील साधक 'अवधूतचिंतन श्री गुरूदेव दत्त' असा जयघोष करत असतात. अवधूत हे दत्तात्रेयाचे नाव असून या शब्दाचा अर्थ म्हणजे– नेहमी आनंदात रमणारा, प्रत्येक क्षण वर्तमानकाळात जगणारा होय. श्री दत्ताच्या पाठीमागे असलेली गाय म्हणजे पृथ्वी व चार श्वान म्हणजे चार वेदांचे प्रतीक आहे. श्री दत्तगुरूंनी पृथ्वीला आपले गुरु मानले होते. पृथ्वीप्रमाणे सहनशील व सहिष्णु असावे, अशी तिच्याकडून त्यांनी शिकवण घेतली होती. तसेच त्यांनी अग्नीला गुरु माणून आपला देह हा क्षणभंगूर आहे, अशी शिकवण त्यांनी अग्नीच्या ज्वालेपासून घेतली होती. अशाप्रकारे चराचरातील प्रत्येक वस्तूत परमेश्वराचे अस्तित्व आहे. ते पाहण्यासाठी श्रीदत्तगुरूंनी चोवीस गुरु केले होते.

श्री दत्त दररोज खूप भ्रमण करीत असत. ते स्नानासाठी वाराणसीला, चंदनाची उटी लावायला प्रयागला जात, तर दुपारची भिक्षा कोल्हापूरला मागत व दुपारचे जेवण पांचाळेश्वर, बीड जिल्हा येथे गोदावरीच्या पात्रात घेत असत. तांबुलभक्षणासाठी मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात राक्षसभुवन येथे जात, तर प्रवचन व कीर्तन ऐकण्यासाठी नैमिष्यारण्यात बिहार येथे पोहचत. निद्रेसाठी मात्र माहूरगडावर जात व योग गिरनार येथे करीत असता. श्री दत्त अवलिये होते. क्षणात कोठेही अंतर्धान पावत असत. श्री कृष्णांच्या लीलाप्रमाणेच श्रीदत्तात्रयाच्या लीला आहे.

महाराष्ट्रात हिंदूंच्या बरोबरीने मुस्लिम समाजही श्रीदत्तप्रभूची उपासना करताना दिसतो. 'श्रीपाद श्रीवल्लभ' हा दत्ताचा पहिला अवतार, 'श्री नृसिंह सरस्वती' हा दुसरा तर 'स्वामी समर्थ  हा तिसरा अवतार आहे. जैनपंथीय श्री दत्तगुरूंची 'नेमिनाथ' म्हणून पूजा करतात तर मुसलमान 'फकिर' म्हणून पूजतात. दत्त जयंतीच्या दिवशी दत्तगुरूंचा जन्मोत्सव साजरा केला जातो. गुरुचरित्राचे पारायण केले जाते. भजन, कीर्तन आदी कार्यक्रम आयोजन केले जाते.

दत्तात्रेय जयंती २०२४च्या दिवशी उपवास पाळणे हे त्रिमूर्ती – ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे अवतार भगवान दत्तात्रेय यांच्या अनुयायांसाठी आवश्यक आहे. उपवास करताना लोक सहसा शारिरीक आणि मानसिक शुद्धता राखण्यासाठी दूध, फळे आणि इतर सात्विक पदार्थांच्या बाजूने धान्य आणि शिजवलेले जेवण टाळतात.

आध्यात्मिक लक्ष केंद्रित करण्यासाठी, मांस, कांदे आणि लसूण यांसारखे तामसिक जेवण पूर्णपणे टाळले जाते. तथापि, लोक निर्जला व्रताचा सराव करून उपवास एक पाऊल पुढे टाकतात, म्हणजे दिवसभर न खाता किंवा पाणी न पिता उपवास करतात.

हा उपवास भक्ती वाढवण्यासाठी आणि आध्यात्मिक ज्ञान प्रदान करण्यासाठी, पृथ्वीवरील आसक्तीपासून सुटका आणि संरक्षणासाठी आदरणीय असलेल्या दत्तात्रेयांच्या फायद्यांना आमंत्रित करण्यासाठी मानले जाते.

दत्तात्रेय जयंती हा एक आनंदाचा उत्सव आहे, जो भक्तांना परमेश्वराच्या देवत्वाचा उत्सव साजरा करण्यासाठी एकत्र आणतो. देवाला प्रसन्न करून, भक्त त्याची बुद्धी आणि मार्गदर्शन शोधतात आणि शांती, लक्ष, ज्ञान आणि आध्यात्मिक वाढीने भरलेल्या जीवनासाठी प्रयत्न करतात.


**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल अकाउंट डिलीट करण्याच्या सोप्या स्टेप्स

कधीकधी काही कारणांमुळे आपले गुगल अकाउंट आपल्याला डिलीट करायचे असते, परंतु ते नेमके कसे करायचे हे समजत नाही. त्यासाठी या काही सोप्या स्टेप्सचा उपयोग करा.




कोणत्याही कारणास्तव एखाद्या व्यक्तीला त्याचे गुगल अकाउंट डिलीट करायचे असल्यास काय बरं करावं हा प्रश्न पडलेला असतो. मग तुम्ही नवीन फोन घेतला असेल म्हणून आधीचे अकाउंट नकोय किंवा विनाकारण उघडलेले अकाउंट डिलीट करायचं असल्यास ते करणं फार सोपं आहे. परंतु, अकाउंट डिलीट करण्यासोबत काही महत्त्वाच्या गोष्टी तुम्हाला लक्षात ठेवणे गरजेचे आहे, ते कोणते ते पाहा.

**अकाउंट डिलीट करण्याचे तोटे**

एखादे गुगल अकाउंट कायमस्वरूपी डिलीट केल्यास, त्यासोबत तुमचे सर्व फोटो, इमेल्स, फाईल्स, कॅलेंडर यासोबतच आतापर्यंतचा सर्व डाटादेखील डिलीट होतो. जी–मेल, ड्राइव्ह, प्ले यांसारख्या सर्व सेवांचा तुम्ही उपयोग करू शकणार नाहीत. त्यासोबतच गुगलवर खरेदी केलेल्या गोष्टी जसे की सिनेमा, संगीत, प, गेम्स आणि टीव्ही कार्यक्रम या सर्व गोष्टीसुद्धा डिलीट होऊन जातील.

**रिव्ह्यू आणि डाऊनलोड**

एखादे अकाउंट डिलीट करण्यापूर्वी तुम्ही तुमचा सर्व डाटा एकदा तपासून आवश्यक वाटणारा डाटा डाऊनलोड करून घेऊ शकता. जर तुमचे जी–मेल अकाउंट ऑनलाइन बँकिंग, सोशल मीडिया आणि कोणत्याही प्ससोबत लिंक्ड असल्यास, तुमच्या अकाउंटमधील रिकव्हरी ई–मेलची माहिती भरून घ्यावी.

**अकाउंट डिलीट करणे**

गुगल अकाउंटमधील डाटा आणि प्रायव्हसी या सेक्शनपाशी यावे. तेथे सर्वांत खाली 'युअर डाटा अँड प्रायव्हसी' हा पर्याय असेल, तो निवडावा. तिथे गेल्यानंतर 'मोर' पर्याय क्लिक करून 'डिलीट युअर गुगल अकाउंट' हा पर्याय निवडावा. त्यानंतर स्क्रीनवर येणाऱ्या सूचनांचे पालन करून आपले गुगल अकाउंट डिलीट करावे. एक गुगल अकाउंट डिलीट केल्याने त्याचा परिणाम इतर कोणत्याही अकाउंटवर होणार नाही हे लक्षात असूद्या..

# मराठी अभिनेते सतीश दुभाषी

मराठी रंगभूमीवर जे अजरामर असे कलाकार होऊन गेले. त्यापैकी एक कलाकार म्हणजे सतीश दुभाषी. त्यांचा जन्म १४ डिसेंबर १९३९ रोजीचा. अवघ्या ४१व्या वर्षी त्यांचे निधन झाले, पण त्यांनी आपल्या अल्पशा काळात रंगभूमीवर काम केले ते लक्षात राहणारे असेच होते. सतीश दुभाषींच्या वेगळ्या अभिनयाच्या शैलीसाठी प्रेक्षक पुन्हा पुन्हा नाटकाचा प्रयोग पहात होते. विशेषत: सतीश दुभाषी ज्या दिग्गज कलाकाराबरोबर असायचे त्याच्यासोबत त्यांची सहज अभिनयाची जुगलबंदी पहायला मिळणे हा आनंद होता.

आजच्या पिढीला सतीश दुभाषी माहिती नसतील कदाचित, पण विविध वाहिन्यांवरून कधीतरी एखादा जुना चित्रपट लागतो आणि त्यात तो कलाकार दिसतो. बाळा गाऊ कशी अंगाई, सिंहसन, चांदोबा चांदोबा भागलास का असा एखादा चित्रपट दिसला की नव्या पिढीतले लोक विचारतात कोण आहे हा नट? मस्त काम केलेय. विशेषत: सिंहासनमधील डिकास्टा पाहिल्यावर नव्या पिढीची हीच प्रतिक्रिया येते, कारण अरुण सरनाईक, दत्ता भट, श्रीराम लागू, निळू फुले यांच्यात अल्पसा वाव मिळूनही डिकास्टा लक्षात राहतो तो दुभाषींमुळेच. आज सतीष दुभाषी म्हणजे चित्रपटसृष्टीतील अभिनेते होते. अल्पशः आजारानंतर त्यांचे मुंबईतील एका रुग्णालयात निधन झाले, एवढेच लोकांना माहिती आहे, पण त्यांनी जे १९७०चे दशक गाजवले आहे त्याबाबत अनेकांना माहिती नाही.



## निमित्त

पुरुषोत्तम दारव्हेकरांची 'अबोल झाली सतार'मधील अपघातात हात तुटल्यामुळे सतार वाजवू न शकणाऱ्या कलाकाराची तगमग भयानक होती. सतीश दुभाषींचा मृत्यू १९८०च्या दशकात झाला होता. त्या वेळी व्हिडीओ चित्रिकरणाचा शोधही नव्हता. त्यामुळे त्यांची नाटके पहायला मिळत नाहीत, पण पुरूषोत्तम दारव्हेकर, पु. ल. देशपांडे, शंन्ना नवरे, वसंत कानेटकर यांच्या शब्दांना आणि नाटकांना न्याय देणारा कलावंत अशीच सतीष दुभाषींची ओळख होती. त्यांची अंमलदार, सूर राहू दे, आनंद ही नाटके खूप गाजली आहेत. यातील आनंद म्हणजे राजेशखन्नाचा गाजलेला आनंद हा सिनेमा. तेच कथानक असलेले हे नाटक तितक्याच ताकदीने रंगभूमीवर गाजले हे अनेकांना माहितीही नसेल.

कन्या सासुरासी जाये, कोंडी, चक्रव्यूह या नाटकांचेही शेकडो प्रयोग झाले, पण त्यांचे तुफान गाजले ते नाटक म्हणजे पु. ल. देशपांडे यांचे ती फुलराणी. सगळ्या चांगल्या गोष्टींची ही जुगलबंदी होती. त्यामुळे हे नाटक नक्की कोणाचे हे सांगणेही कठीण. पु. ल. देशपांडे यांचे शब्द. भाषाशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी आव्हान वाटावे अशी संहिता. मूळच्या पिग्मिलियनच्या नाटकाचा मराठीतील अस्सल रूपांतर. भक्ती बर्वेचा टायटल रोल. यात कमाल केली ती सतीष दुभाषींनी. भक्ती बर्वे आणि सतीश दुभाषी हे दोघे इतके बेभान होऊन हे नाटक करायचे की त्या आनंदात प्रेक्षक अक्षरश: डुंबायचे. त्या काळात 'ती फुलराणी'चे दौरे प्रचंड होते. त्यामुळे त्यांना अनेक नाटकांसाठी फारसा वेळ देता येत नव्हता. त्यामुळे तूच माझी राणी, देह देवाचे मंदिर या नाटकांचे फारसे प्रयोग झाले नाहीत. त्यानंतर त्यांनी नटसम्राट, नेपोलियन, पार्टी, बिवी करी सलाम अशी वेगवेगळ्या विषयांवरील अनेक नाटके केली. ती फुलराणीनंतर सतीश दुभाषी दीर्घकाळ स्मरणात राहिले ते वसंत कानेटकर यांच्या बेईमान या नाटकात. त्यानंतर आले ते सतीश दुभाषींचे आणखी एक जुगलबंदी असलेले नाटक ते म्हणजे विजय तेंडुलकरांचे शांतता कोर्ट चालू आहे. रंगभूमीवर अल्पकाळ राहून दीर्घकाळ स्मरणात राहणारा हा अभिनेता. टीव्ही आणि वाहिन्यांच्या जमान्यात हा नट आज हयात असता तर तो छोटा पडदाही दीर्घकाळ त्याने व्यापून टाकला असता, इतका हा असामान्य कलाकार होता.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : येथील काशिद समुद्रकिनारी अनेक पर्यटक वॉटर स्पोर्ट्सचा आनंद घेत असतात.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यामध्ये कमी पाणी पिणे आरोग्यासाठी घातक

सध्या थंडीचे दिवस सुरू आहेत. थंडीच्या या दिवसांमध्ये अनेक आजार निर्माण होत असतात. मग ताप, थंडी, सर्दी, खोकला असे अनेक आजार निर्माण होताना दिसतात. त्यात थंडीच्या दिवसात लोक जास्त पाणी पित नाहीत. कारण हिवाळ्यामध्ये जास्त तहान लागत नाही. त्यामुळे लोकं फार कमी पाणी पितात. मग कमी पाणी पिल्यामुळे त्याचे आपल्या शरीरावर दुष्परिणाम दिसतात. मग लोकांना अनेक गंभीर आजारांचा सामना करावा लागतो.



किडनीवर वाईट परिणाम– जर तुम्ही थंडीच्या दिवसांमध्ये कमी पाणी पिलं तर त्याचा तुमच्या किडनीवर वाईट परिणाम होतो. किडनीवर कोणताही परिणाम होऊ द्यायचा नसेल तर भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. शरीरात पाण्याची कमतरता असेल तर किडनीवर दबाव येतो, त्यामुळे युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन किंवा ट्रॅकमध्ये जळजळ अशा समस्या निर्माण होतात. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये तहान जरी लागली नाही तरी भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे.

अशक्तपणा येतो – थंडीच्या दिवसांमध्ये कमी पाणी पिले तर शरीरात अशक्तपणा निर्माण होतो. पाण्याच्या कमतरतामुळे आपले शरीर कमजोर होते त्यामुळे आपल्या शरीरातील रक्ताची, ऑक्सिजनची कमतरता भासते. मग आपल्याला थकवा येतो अशक्तपणा येतो. त्यामुळे प्रत्येकाने भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे.

पोटाशी संबंधित आजार – शरीरात पाण्याची कमतरता असेल तर त्याचा परिणाम आपल्या पोटावर होतो. मग बद्धकोष्ठतापासून ते अन्नपचनाशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात. तर अशा गंभीर समस्यांचा सामना करायचा नसेल तर भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे.

त्वचा निस्तेज होते – शरीरात पाण्याची कमतरता असेल तर आपले शरीर हायड्रेट राहत नाही. तसेच शरीरातील पाण्याच्या कमतरतेमुळे आपली त्वचा निस्तेज होते म्हणजेच आपली त्वचा कोरडी पडते. त्यामुळे जर तुम्हाला तुमची त्वचा कोरडी पडू द्यायची नसेल आणि दिवसभर ओलसर ठेवायची असेल तर दररोज पाच ते सात ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे यामुळे आपली त्वचा निरोगी आणि चमकदार राहते.

थंडीच्या दिवसांमध्ये निरोगी राहायचे असेल तर भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येकाने तीन ते चार लिटर पाणी पिणे खूप गरजेचे आहे. थंडीच्या दिवसांमध्ये गंभीर आजारांपासून स्वतःचा बचाव करायचा असेल तर दिवसाला सात ते आठ ग्लास पाणी प्या, यामुळे तुम्हाला कोणतेही आजार होणार नाहीत.

# माथेरानच्या ई-रिक्षा कायमस्वरूपी सुरू ठेवा

## भाजपची मागणी



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील महत्त्वपूर्ण समजला जाणारा आणि प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेला ई-रिक्षा प्रकल्प हा या ठिकाणी कायमस्वरूपी सुरू व्हावा तसेच ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करावी याकरिता माथेरान भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन याबाबत त्यांना निवेदन सादर केले.

माथेरान शहरात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एक वर्षाच्या प्रयोगिक तत्वावर पर्यावरणपूरक ई-रिक्षा प्रकल्प सुरू आहे. डिसेंबर महिन्याअखेर या प्रकल्पाची मुदत संपत आहे. माथेरान हे एक थंड हवेचे सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्याने या ठिकाणी सुरू असलेल्या ई-रिक्षा प्रकल्पामुळे येथील पर्यटनात मोठी वाढ झालेली पाहवयास मिळाली. ई-रिक्षा सुरू झाल्यापासून हजारोंच्या संख्येने माथेरानमध्ये पर्यटक येत असल्याची माहिती संघटनेकडून देण्यात आली तसेच स्थानिक विद्यार्थी, दिव्यांग बांधव, जेष्ठ नागरिक व रुग्णांनासुद्धा ई-रिक्षाचा मोठा दिलासा मिळाला.

माथेरानकरांच्या आणि येथील पर्यटनाच्या दृष्टीने फायदेशीर ठरलेला ई-रिक्षा प्रकल्प या ठिकाणी कायमस्वरूपी सुरू करावा अशा आशयाचे निवेदन माथेरान भाजप शिष्टमंडळाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना देण्यात आले. या वेळी भाजप माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, शहर चिटणीस राजेश चौधरी, कर्जत तालुका आदिवासी मोर्चा अध्यक्ष संदीप कदम, संपर्क प्रमुख प्रदीप घावरे, माथेरान शक्ती केंद्र प्रमुख दीपक शहा, सह संपर्क प्रमुख संतोष कदम, माजी नगरसेवक राकेश चौधरी, उद्योजक शैलेश चाफेरकर, विजाराम चौधरी उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषद, रायगड
आरोग्य विभाग
Email: dhozpraigad@gmail.com दूरध्वनी क्र ०२१४१-२२२०७७

ई-निविदा सूचना

रायगड जिल्हा परिषद, अलिबाग अंतर्गत आरोग्य विभागाकरीता **कंत्राटी वाहन चालक पुरविणेसाठी (सन २०२४-२५ )** ई-निविद सुचना http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली आहे
निविदेबाबतीत सर्व माहिती संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

जा.क्र. राजिप/आरोग्य/वाहने/५९३६/२०२४

**सही/-**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

मोबाईलच्या दुकानात मुलगा-मुलगी पाहिजे

रिसेप्शन -१
चिप लेवल रिपेअर -१
बेसिक मोबाईल रिपेअर -१

**पत्ता :** मोबीमॅन मोबाईल सर्विस सेंटर, शहा आर्केड, प्लॉट नंबर १५०, एमसीसीएस सोसायटी ब्लू स्टोन ज्वेलरी शॉपच्या समोर, एनकेजीएस बँकेच्या खाली, पनवेल

मो : ८८५०९३३९७५

# घटस्फोटीत पत्नीकडून दुसऱ्या पत्नीला धमकी; गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**




घटस्फोटीत पहिल्या पत्नीने दुसऱ्या पत्नीच्या कामाच्या ठिकाणी जबरदस्तीने प्रवेश करून तेथील सामानाची व वस्तूची मोडतोड करून धमकी दिल्याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून दिलेल्या माहितीनुसार यातील फिर्यादी आणि आरोपी या एकमेकींच्या सवती असून आरोपी या फिर्यादी यांच्या पतीच्या पूर्वाश्रमीच्या घटस्फोटीत पत्नी आहेत. फिर्यादी मनीषा रामजी गुप्ता (वय ५६, रा. नांगलवाडी, महाड) या बिरवाडी येथील पॅनरोमा केम पेंट प्रा. लि. कंपनीमध्ये डायरेक्ट पदावर आहेत. ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आरोपी अर्चना रामजी गुप्ता यांनी फिर्यादी यांच्या कंपनीमध्ये विनापरवानगी जबरदस्तीने प्रवेश करून आवारातील सिक्युरिटी केबिनच्या काचा फोडल्या, कर्मचारीवर्गास शिवीगाळ केली तसेच काम बंद करण्यास सांगून कंपनी जाळून टाकण्याची धमकी दिली.

याबाबत मनीषा गुप्ता यांनी अर्चना गुप्ता यांच्या विरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली असून त्यानुसार कारवाई करत पोलिसांनी अर्चना यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून भारतीय न्याय संहिता कलमांनुसार कारवाई केली आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# एक्स्प्रेस वेवर पादचारी ठार

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहनाच्या धडकेत इसमाचा मृत्यू झाला असून अपघाताची घटना भाताण बोगद्यात गुरुवारी रात्री १०च्या दरम्यान घडली. मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नाही.

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत १२ डिसेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील भाताण बोगद्यामध्ये लेन ३जवळ मुंबई बाजुकडून येणाऱ्या वाहनाने अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयोगटातील अंगात पिवळसर रंगाचा शर्ट व राखाडी पँट परिधान केलेल्या अनोळखी इसमास ठोकर मारली. या अपघातात गंभीर जखमी इसमाचा घटनास्थळी मृत्यू झाला. मयत व्यक्तीजवळ ओळख पटेल असा कोणताही पुरावा न सापडला नाही. रसायनी पोलीस ठाणे येथे अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई प्रमोद ह्यांबिर करीत आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **महादया हाल्या ठाकूर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 23583197673), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/२८३ खाते क्रमांक : ६७३ | २ | ०.०९.८० पो.ख. ०.०१.३० | १.४४ |
| | | एकुण ०.११.१० | |

**एकुण क्षेत्र ०.११.१० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **पद्मावती राघव ठाकूर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 33491234910), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३९२ खाते क्रमांक : १०७ | २ | ०.२९.०० पो.ख. ०.०४.०० | ४.१९ |
| | | एकुण ०.३३.०० | |

**एकुण क्षेत्र ०.३३.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्रीरंग सहदेव ठाकूर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 36663498590), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३६० खाते क्रमांक : ६०७ | २ | ०.३५.०० पो.ख. ०.०५.०० | ५.०६ |
| | | एकुण ०.४०.०० | |

**एकुण क्षेत्र ०.४०.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **हिराबाई हरिश्चंद्र पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 13411431378), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३४७ खाते क्रमांक : ८५५ | २ | ०.२४.०० पो.ख. ०.०३.३० | ३.४४ |
| | | एकुण ०.२७.३० | |

**एकुण क्षेत्र ०.२७.३० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **काशीबाई केशव ठाकूर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 14267135239), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३९१ खाते क्रमांक : ८५० | २ | ०.८३.२० पो.ख. ०.११.९० | ११.९४ |
| | | एकुण ०.९५.१० | |

**एकुण क्षेत्र ०.९५.१० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **शेवंती रमेश पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 35257058930), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३७६ खाते क्रमांक : ७६२ | २ | ०.२८.०० पो.ख. ०.०४.०० | ४.०६ |
| | | एकुण ०.३२.०० | |

**एकुण क्षेत्र ०.३२.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक कोकण-विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, डिसेंबर १२-१८, २०२४ / अग्रहायण २१-२७, शके १९४६

## उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग अलिबाग, रायगड यांजकडून पुरवणी ३२ (२) अधिसुचना

क्रमांक उविअ/एसआर-०२/शहाबाज/पोहोच रस्ता/पुरवणी / २०२४, म.औ.वि.म. - ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) यांच्या कलम एक पोट-कलम (३) अन्वये दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली प्रकरण ६ तसेच दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी अधिसुचित केलेल्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे. त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी संपादन करण्यास अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी / १८९२ (१७४४१ ) / उद्योग १४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आयडीसी / २०१९ (प्र.क्र. ४५५) / उद्योग -१४, दिनांक १७ एप्रिल २०२३ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ च्या नियम २८ ने जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त नियमाची कलम ३२, कलम ३३, कलम ३६ व कलम ३८ चे अधिकार आणि कलम २ (क) अन्वये उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, जि. रायगड यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या क्षेत्राची महामंडळास धेरंड, शहापूर औद्योगिक क्षेत्राच्या पोहच रस्त्याकरिता जमिनी संपादन करणे आवश्यक आहे असे उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग यांना वाटते ;

उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभागीय अलिबाग यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२) ची अधिसूचना क्रमांक उविअ / एसआर ०२ / शहाबाज / अलिबाग / २०२३, जुन २९ - जुलै ५, २०२३ अन्वये घोषित केली. सदर अधिसुचना **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार -ब, दिनांक १३ एप्रिल २०२३, पृष्ठ क्रमांक १ ते ३ वर प्रसिद्ध झाली आहे. खालील अनुसुचीतील स.नं./गट नं. संयुक्त मोजणी अंती नव्याने संपादनात समाविष्ट होत आहेत. परंतु उक्त अधिसूचनेत प्रसिद्ध करण्याचे राहीले आहेत. खालील नव्याने समाविष्ट होणारे सर्व्हे नं./गट नं. / क्षेत्र व हिस्सा नंबर या पुरवणीद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

ज्यांची व्यक्तिगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीशीचे तारखेपासून एक महिन्याच्या आत भेटीची वेळ ठरवून कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी ११-०० ते ०१-०० वाजेपर्यंत खालील सही करणाऱ्याच्या कार्यालयात अलिबाग येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीरं मुखत्यारामार्फत हजर रहाता येईल.

### अनुसूची

**मौजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ गट क्रमांक | क्षेत्र हे.आर. | अ.क्र. | सर्व्हे क्रमांक गट क्रमांक | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९६ पै | ०.०७३० | ६ | ६१८ पै | ०.३६८० |
| २ | ९९ पै | ०.०५८५ | ७ | ६२३ पै | ०.२९९० |
| ३ | ५७६ पै | ०.०४०० | ८ | ६२४ पै | ०.३०११५ |
| ४ | ५८५ पै | ०.२४२० | ९ | ९८७ पै | ०.०२०५ |
| ५ | ६१७ पै | ०.००३० | | **एकूण क्षेत्र** | **१. ११५५** |

अलिबाग,
दिनाक ४ डिसेंबर २०२४.

क्र. जिमाका/राअ/जाहि /१७३/२०२४-२५

**सही/-**
**मुकेश चव्हाण,**
उप विभागीय अधिकारी अलिबाग,
उप विभाग, अलिबाग.

# प्रस्तावित आर्केस्ट्रा बारला तीव्र विरोध

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा-पामबीच येथील सेक्टर १७मध्ये येवू घातलेल्या ऑर्केस्ट्रा डान्स बारला स्थानिक नगरसेविकांसह नागरिक यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात हरकती दाखल करत, आपला तीव्र विरोध नोंदविला आहे.



सानपाडा - पामबीच प्लॉट नंबर ९ से-१७ येथील दि अफेअर्स या इमारतीतील प्रस्तावित मे. हौसा रेस्टॉरंटमध्ये मद्यपान (बार) व मनोरंजन ऑर्केस्ट्रा (डान्स बार) आल्यास या परिसरात घडणाऱ्या असामाजिक कृत्यांविरोधात स्थानिक माजी नगरसेविका रुपाली भगत व वैजयंती भगत यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात परवाना शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांची भेट घेत, त्यांना हरकती पत्राचे निवेदन सादर केले.

या वेळी उपस्थित परिसरातील महिला व जेष्ठ नागरिक यांनीही सदर डान्स बारला विरोध दर्शविणारे आपले हरकत पत्रे दाखल केली. यावेळी नवी मुंबईचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्यासह समाजसेवक संदीप भगत हे उपस्थित होते.

या वेळी दोन्ही महिला लोकप्रतिनिधी यांनी संबंधित पोलीस प्रशासनाकडे आमच्या हरकतींची दखल घेऊन संबंधित डान्स बारला परवाना देऊ नये तसेच कायद्याचे उल्लंघन करून देण्यात

### नागरिकांकडून पोलिसांकडे हरकती दाखल

आलेले मद्यपान परवाना हा देखील रद्द करावा अशी मागणी हरकत पत्राद्वारे केली. अन्यथा, लोकहितार्थ लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन व प्रसंगी न्यायालयीन लढाई लढण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

सानपाडा से-१, १३ ते १९ या क्षेत्रामध्ये सर्वसामान्य व उच्च शिक्षित तसेच प्रतिष्ठीत नागरिक राहत आहेत, राज्य शासन, महापालिका व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने विविध विकास कार्ये या परिसरात झाले असून कायदा सुव्यवस्थेची उत्तम राखण केली जात आहे. येथील नागरिक गुण्यागोविंदाने कौटुंबिक एकोप्याने भारतीय संस्कृती व परंपरेचे जतन करून आपले दैनंदिन जीवनमान शांततेने आनंदात जगत आहेत, मात्र उत्तम जीवनमान जगणाऱ्या नागरिकांच्या रहिवासी क्षेत्रात सानपाडा- पामबीच प्लॉट नंबर ०९ से-१७ येथील दि अफेअर्स या इमारतीत मे. हौसा रेस्टॉरंट या नावाचे प्रस्तावित ऑर्केस्ट्रा डान्स बार येऊ घातल्याने परिसरातील सर्वच सोसायट्यामधील रहिवाश्यांमध्ये विशेषतः महिला व जेष्ठ नागरिकांमध्ये तीव्र स्वरूपाच्या संतापाच्या भावना आहेत.

ज्यासाठी आगामी काळात नागरिकांचे जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याने या बारला स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांचा विरोध वाढू लागला आहे.

# 'जीआयएस'द्वारे अतिक्रमणांवर राहणार लक्ष

**खारघर : प्रतिनिधी**

शहरात वाढणारी बेसुमार अनधिकृत बांधकामे, रस्त्यावर थाटलेली दुकाने तसेच फेरीवाल्यांचा उन्माद रोखण्यासाठी पारदर्शक उपाय म्हणुन पनवेल महापालिका जीआयएस यंत्रणेद्वारे या अतिक्रमणांवर लक्ष ठेवणार आहे. खासगी संस्थेची याकरिता नियुक्ती करण्यात येणार आहे.

पूर्वाश्रमीच्या नगरपरिषद आणि ग्रामीण भागात तसेच झोपडपट्टी, तळोजा एमआयडीसी भागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले जात आहे. जीआयएस यंत्रणेद्वारे याच्यावर लक्ष ठेवल्यास वाढणारी अतिक्रमणे पालिकेच्या त्वरित निदर्शनास येतात. त्यामुळे पनवेल महापालिका या तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे.

प्रशासक मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत जीआयएसप्रणालीवर आधारीत अतिक्रमण नियंत्रण यंत्रणा उभारण्याच्या निर्णयाला मंजूरी देण्यात आली. प्रत्येक चार महिन्याला महापालिका क्षेत्रातील सॅटेलाईट इमेज घेतली जाईल. वर्षांतून ३ वेळा इमेज घेतल्यामुळे वाढलेल्या बांधकामाबाबत माहिती संग्रहीत राहिली. ही वाढलेल्या बांधकामाची माहिती सॉफ्टवेअरच्या माध्यमातून एकत्रित करून ही माहिती नगररचना उपसंचालक विभागाला कळविण्यात येईल.

**वाढणाऱ्या झोपडपट्टीवर असेल नियंत्रण**

व्होट बँकेसाठी झोपडपट्टी वसविण्याचे प्रकार मुंबई,नवी मुंबई मध्ये झाल्याचे पहावयास मिळाले आहे.पनवेल मध्ये देखील असे प्रकार सुरुवातीच्या काळात झाले.मात्र पालिकेने त्यावर वेळेत आळा घातला होता. या यंत्रणेमुळे निश्चितच इतर अनधिकृत बांधकामासह बेकायदेशीर झोपडपट्टी वाढीवर नियंत्रण राहणार आहे.

# केएलई कॉलेज ऑफ लॉमध्ये ज्ञानवर्धक संवादात्मक सत्र



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केएलई कॉलेज ऑफ लॉ, कळंबोली येथे १० डिसेंबर रोजी एक ज्ञानवर्धक संवादात्मक सत्राचे आयोजन केले होते. या वेळी करण जोशी, ऑरेंज लॉ पीएलएलसीचे सीईओ आणि संस्थापक (ह्यूस्टन, टेक्सास-स्थित फर्म इमिग्रेशन) आणि डॉ. अलका पाटील, मुंबई विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक तसेच या सत्राच्या अध्यक्षस्थानी केएलई कॉलेज ऑफ लॉचे प्राचार्य प्रा.डॉ.दिनकर गित्ते उपस्थित होते. त्यांचे अध्यक्षीय भाषण झाले.

या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक उद्दिष्टांची पूर्तता केली. करण जोशी यांनी विद्यार्थ्यांशी युनायटेड स्टेट्समधील भविष्यातील अभ्यासाच्या संधींबद्दल, इमिग्रेशन कायदे आणि परदेशात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध मार्गांवर लक्ष केंद्रित करून या सत्रात संवाद साधला. त्यांनी यूएस इमिग्रेशन धोरणांच्या समस्यांवर मार्ग काढण्यासाठी व्यावहारिक सल्ला दिला आणि जागतिक कायदेशीर क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्यांवर प्रकाश टाकला. डॉ. अलका पाटील यांनी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनाचे औचित्य साधुन एक अभ्यासपूर्ण भाषण केले आणि समाजाच्या उभारणीसाठी त्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी मानवाधिकार वकिलीतील प्रमुख घडामोडींवर चर्चा केली आणि सार्वत्रिक अधिकारांना प्रोत्साहन देणाऱ्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. दिनकर गित्ते यांनी घटनात्मक आणि मानवी हक्क समजून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सामाजिकदृष्ट्या जबाबदार कायदेशीर समुदायाला आकार देण्यासाठी त्यांच्या प्रासंगिकतेवर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाने महाविद्यालयाची शैक्षणिक उत्कृष्टतेची बांधिलकी आणि विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दृष्टीकोन वाढवण्याच्या त्याच्या समर्पणाला बळकटी दिली.

# वाशी व कोपरखैरणेमध्ये अनधिकृत बांधकामाविरोधात धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशान्वये अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही कोपरखैरणे विभागात संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सी विभाग वाशी अंतर्गत वाशीगांव येथे श्री. अफताब जाकारीया जानवेकर व परवेज जाकारीया जानवेकर, युनिट क्र. एस.एस/३-२२७, सेक्टर- ०२, वाशी, नवी मुंबई यांचे इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घता अनधिकृतपणे सुरु होते. सदर अनधिकृत बांधकामास वाशी विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३ १(अ) अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हुन हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते सदर अनधिकृत बांधकामावर वाशी विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले. तसेच संबंधितांनकडून रु.२५ हजार दंडही वसूल करण्यात आलेला आहे. सी विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली सदरचे बांधकाम अशंत: हटविण्यात आले. या धडक मोहिमेसाठी अतिक्रमण विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. या धडक मोहिमेसाठी एकूण १० मजुर, १ इलेक्ट्रिकल हॅमर व जेसीबी यांचा वापर करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत पवार के एम,एस.एस टाईप, रूम नं ९०९,सेक्टर-१५,कोपरखैरणे, नवी मुंबई, व डी.पी.पवार, एस.एस टाईप, रूम नं ९१०,सेक्टर-१५,कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर तोडक कार्यवाही करण्यात आली.सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहा.आयुक्त सुनिल काठोळे, कनिष्ठ अभियंता सचिन नामवाड व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# उरणमध्ये मच्छीमार सोसायटीचे उद्घाटन

**उरण : बातमीदार**

उरण शहरातील कोळीवाडा येथे रविवार दिनांक ८/१२/२०२४ रोजी दुपारी ४ वाजता उरण कोळीवाडा पारंपारिक मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित या मच्छीमार सोसायटीचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात करण्यात आले.

पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांचे, मासेमारी करणाऱ्या व्यवसायिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी व शासनाच्या विविध सेवा, सवलती, योजनांचा लाभ घेण्यासाठी मच्छिमारांच्या प्रश्नांना, समस्यांना न्याय देण्यासाठी त्यांचे अधिकार व हक्क त्यांना मिळवून देण्याच्या उद्देशाने या मच्छीमार सोसायटीचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी मच्छीमार नेते रमेश कोळी, फादर मार्शल लोपेझ, मच्छीमार नेते रामदास कोळी, सामाजिक कार्यकर्ते पर्यावरण प्रेमी नंदकुमार पवार, प्राची कोळी आदी उपस्थित होते.

# महाड सत्याग्रह मानवी हक्काचा पाया -डोंगरगावकर

नवी मुंबई : प्रतिनिधी

ऐतिहासिक महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह हा खऱ्या अर्थाने मानवी हक्काचा पाय असून ही घटना भारताच्या संविधानाचा कळस आहे. जागतिक स्तरावर संविधानातील कायदा हा भारतीयांना सुरक्षा देणारा जाहीरनामा आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी खारघर येथे बोलताना केले.



व्हाईस ऑफ इंडिजिनिअस पीपल्स फॉर जस्टीस अँड पीस आणि डॉ. जी. के. डोंगरगावकर विधी महाविद्यालय लिगल क्लिनिकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शांताबाई रामराव सभागृह, खारघर नवी मुंबई येथे जागतिक मानवी हक्क दिनाचे आयोजन अ‍ॅड. किशोर कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या वेळी उद्घाटनपर बोलताना डॉ. डोंगरगावकर यांनी आपले मत व्यक्त केले.

या वेळी अध्यक्षीय भाषणात अ‍ॅड. किशोर कांबळे यांनी भारतामध्ये मानवाधिकार कायद्याच्या अंमलबजावणी समोरील आव्हाने यावर मार्गदर्शन केले. मानवाधिकार आयोग अधिक कार्यक्षम आणि सशक्त होण्यासाठी लोकजागृती होणे अपरिहार्य असल्याचे सांगत डिजिटल युगातील नव्या आव्हानांला सामोरे जाण्यासाठी या कायद्यात सुधारणा होणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले तर प्रमुख वक्ते अ‍ॅड. अरुण सुरवाडे यांनी जागतिक मानवी हक्क कायदा त्याची निर्मिती आणि सत्ता यावर मार्गदर्शन करत मानवाधिकार कायद्याची आवश्यकता मांडली.

भारताने १९९३पासून या कायद्याची अंमलबजावणी केली आहे. या कायद्यातील तरतुदीचे संयुक्त राष्ट्रसंघाशी सलग्न देशांनी राबवणे सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यकमाला नागरिक, महाविद्यालयीन विध्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शिवाजी आमटे यांनी केले.

# केबीपी कॉलेजला योगा व कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या गौरी गव्हाणे या विद्यार्थिनीने दि. ०९ डिसेंबर रोजी विलेपार्ले येथे आयोजित केलेल्या इंटर कॉलेजियट योगा स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले. मुंबई विद्यापीठ व डहाणूकर कॉलेज विलेपार्ले यांच्या संयुक्त विद्यमाने योगा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.





गौरी गव्हाणे ही विद्यार्थीनी पदवीच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत आहे. यापूर्वीही त्याने योगा स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे. तसेच विघ्नेश्वर मेंढकर या विद्यार्थ्यांने ५७ किलो वजनी गटात कुस्ती स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले. ही स्पर्धा दि. १० डिसेंबर रोजी कल्याण येथे मुंबई विद्यापीठांतर्गत झाली. विघ्नेश्वर मेंढकर हा विद्यार्थी पदवीच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले. उपप्राचार्य प्रो.डॉ.राजेश्री घोरपडे तसेच जिमखाना चेअरमन डॉ. बिपीन शिंदे, क्रीडा संचालक प्रा. महादेव खाडे व जिमखानाप्रमुख प्रा. भास्कर हनवटे यांनी त्याचे अभिनंदन केले.

## शुभेच्छा..!



**पनवेल : विधानसभा निवडणुकीत उरण मतदारसंघामध्ये इतिहास घडवत आमदार महेश बालदी सलग दुसऱ्यांदा निवडून आले. यानंतर ते पहिल्यांदाच भाजप मध्यवर्ती कार्यालयात आले असता त्यांना तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, महेंद्र गोजे यांच्यासह कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.**

# आर्थिक साक्षरता व बँकिंग नोकरी संधी कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर आर्ट्स सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालय महालन विभाग फुंडे येथे बँकिंग करिअर मार्गदर्शन आणि आर्थिक साक्षरता याविषयी एक दिवसीय कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली.



या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात सुरू असलेले विविध व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नेहमीच कटिबद्ध असल्याचे नमूद केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात, सेबी या नामांकित संस्थेच्या मार्गदर्शक सुषमा दास यांनी सिक्युरिटी मार्केटमधील गुंतवणूक आणि नोकरीच्या संधींविषयी सखोल माहिती दिली. त्यांनी आर्थिक फसवणुकीपासून बचाव कसा करता येईल, यावरही मार्गदर्शन केले. याच सत्रात बजाज फिनसर्व्हचे प्रमुख प्रशिक्षक विनोद प्रजापती यांनी विमा आणि फायनान्स क्षेत्रातील नोकरीसाठी आवश्यक कौशल्यांवर सविस्तर चर्चा केली.

दुसऱ्या सत्रात आयसीआयसीआय बँकेचे भारतीय पश्चिम विभागाचे डेप्युटी जनरल मॅनेजर निरंजन मोहिते यांनी बँकिंग क्षेत्रातील बदलांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात गेल्या सात-आठ वर्षांत कशाप्रकारे संधी उपलब्ध झाल्या असल्याचे उदाहरण दिले आणि आधुनिक बँकिंग प्रणाली स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य विकसित करावे, असे आवाहन केले.

कार्यशाळेत २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेचे समन्वयक प्रा. भूषण ठाकूर आणि प्रा. प्रांजल भोईर होते. कार्यक्रमात डॉ. सोनावले, प्रा. दिव्या ठाकूर, प्रा. रेणू सरोज, प्रा. आरती पाटील, आणि प्रा. तन्वी कोळी यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिक्षिता म्हात्रे व प्रा. प्रियंका ठाकूर यांनी केले, तर प्रा. पंकज भोये यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यशाळेने विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता आणि बँकिंग क्षेत्रातील रोजगारसंधींबाबत प्रेरणा आणि दिली त्यासाठी आवश्यक त्या तयारीचे मार्गदर्शन लाभले.

# श्रीवर्धनमध्ये सीआरझेड कायद्याचे उल्लंघन

## समुद्र किनारपट्टीला लागूनच अनधिकृत बांधकामे

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये सीआरझेड कायद्याचे सर्रासपणे उल्लंघन सुरू असल्याची बाब समोर आली आहे. भौगोलिक परिस्थिती पाहता श्रीवर्धन तालुक्याला दिघी ते बागमांडले असा ५२ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. या समुद्रकिनाऱ्यावर असंख्य गावेदेखील वसलेली आहेत. सध्या मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील अनेक धनदांडगे समुद्रकिनारी जागा विकत घेऊन, त्या ठिकाणी रिसॉर्ट्स, बंगले बांधण्यासाठी इच्छुक आहेत, तर अनेकांनी आपल्या इमारती, बंगले, रिसॉर्ट्स इत्यादी समुद्रकिनारी कोणत्याही परवानग्या न घेता बांधूनदेखील टाकले आहेत.



मे महिन्यामध्ये देशात लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक तसेच नुकत्याच राज्यात विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक झाल्या. या निवडणुकांची जबाबदारी महसूल विभागावर प्रामुख्याने असते. याचाच फायदा अनेक धनदांडग्यांनी उचलून आपली अनधिकृत बांधकामे उभी केली आहेत. संपूर्ण महसूल प्रशासन निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये गुंतलेला असताना अन्य कामांमध्ये लक्ष देण्यास त्यांना वेळ मिळाला नाही. ते पाहून अनेकांनी आपला कार्यभाग साधला आहे.

समुद्र किनारपट्टीपासून पाचशे मीटरचे अंतरापर्यंत सीआरझेड कायदा लागू असतो. यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही, पण श्रीवर्धन तालुक्यातील खारगाव आरावी ग्रामपंचायत, भरडखोल ग्रामपंचायत, दिवेआगर ग्रामपंचायत, सर्वे, आदगाव ग्रामपंचायत या सर्व ठिकाणी अशा प्रकारची अनेक अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. मुंबई, पुण्यातून येणारे धनाढ्य लोक काही स्थानिक लोकांना आपल्या हाताशी धरून अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे करत असल्याचे समोर आले आहे.

याबाबत माहिती घेतली असता अनेक बांधकाम करणारे असे सांगतात की, सीआरझेड कायद्यामध्ये शिथिलता आली आहे, पण हा कायदा शिथिल केल्याबाबतचा कोणताही शासन आदेश (जीआर) प्रशासनाकडे उपलब्ध नाही. याचा गैरफायदा जर का अनधिकृत बांधकाम करणारे घेत असतील, तर त्यांच्यावर दंडात्मक अथवा तोडक कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनाने अशा प्रकारची कारवाई केली नाही, तर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना व सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना एका प्रकारे अभयच मिळेल, असे अनेकांचे मत आहे. याबाबत तालुक्यातील काही जागरूक नागरिक राज्य शासनाकडे दाद मागणार आहेत.

# म्हसळा तालुक्यातील शंभर टक्के शाळा तंबाखूमुक्त म्हणून घोषित

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या म्हसळा तालुक्यातील शंभर टक्के शाळा तंबाखूमुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. पोलादपूर तालुक्यातील ९८ टक्के शाळा तंबाखूमुक्त झाल्या आहेत. जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या आढावा बैठकीत ही माहिती देण्यात आली. तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व्यापक करण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी दिले आहेत.

जिल्ह्यात तीन हजार ७८९ शाळा आहेत. यामधील तबांखूमुक्त शाळा कार्यक्रम अंतर्गत एक हजार दोन शाळांनी नोंदणी केली होती. पैकी ७३९ शाळा तंबाखूमुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या, तर दोन हजार ७५० शाळा तंबाखूमुक्त




होणे अद्यापही शिल्लक आहे. म्हसळा तालुक्यातील सर्वच्या सर्व ११६ शाळा तंबाखूमुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या. त्यापाठोपाठ पोलादपूर तालुक्यातील सर्व शाळा तंबाखूमुक्त म्हणून घोषित होण्याच्या मार्गावर आहेत.

पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, पेण, अलिबाग आणि महाड या तालुक्यांमध्ये शिक्षण विभागाने राष्ट्रीय तंबाखूमुक्ती कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शैक्षणिक संस्थेलगतच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवरील बंदीची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश प्रशासनाने यंत्रणांना दिले आहेत.

अलिबाग २९०पैकी ३२, महाड ४०८पैकी २१, म्हसळा ११६पैकी ११६, श्रीवर्धन १४०पैकी ४३, तळा १०३पैकी ८४, माणगाव ३८१पैकी ८७, सुधागड १८७पैकी ४, रोहा २८६पैकी २७२, मुरूड १२९पैकी ५१, पेण ३०६पैकी १५, खालापूर २६७पैकी २२, कर्जत ३५३पैकी २७, पनवेल ५३५पैकी ४४, उरण १४४पैकी ४२, पोलादपूर १४४पैकी १४३ शाळा तंबाखूमुक्त झाल्या आहेत.

# हमरापूरमध्ये नेत्रचिकित्सा शिबिरास प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हमरापूर येथे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि हमरापूर विकास मित्र मंडळ यांच्या संयुत विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद लाभला. शिबिरात जवळपास सव्वाशेहून अधिक लोकांची तपासणी करण्यात आली.

या वेळी शिबिराचे आयोजक माजी सरपंच प्रदीप म्हात्रे, विद्यमान सरपंच राकेश दाभाडे, दादर सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक नागेश कदम, उपसरपंच ओंकार पाटील, संजय पाटील, रवींद्र शेदवळ, अतुल भगत, महेंद्र पाटील, राजू भगत, संजय नाईक, सतीश पाटील, चंद्रकांत भगत, शंकर भगत, सचिन गोलिमडे, संदेश कदम आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

या शिबिरात नंबर तपासणी तसेच डोळ्यांच्या इतर आजारांची तपासणी करण्यात आली तसेच ज्यांना मोतीबिंदू आहे त्यांना पनवेल येथील रुग्णालयात ऑपरेशनसाठी बोलवण्यात आले आहे.




# महिलेची चेन खेचून पोबारा

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर महड फाट्याजवळ हाळ येथे अज्ञात व्यक्तीने दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील चेन खेचून पोबारा केला.

खोपोलीकडून चौक येथे जयश्री खंडू मालकर आपल्या पतीबरोबर चौक येथे जाण्यासाठी मोटरसायकलवरून जात असताना एका अज्ञात इसमाने खोपोली शिळफाटा येथून पाठलाग केला आणि महड फाटा हाळ गावच्या थोडे पुढे मागे बसलेल्या महिलेच्या गळ्यातील चेन खेचून पोबारा केला. खालापूर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुरूडमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड-जंजिरा आणि तालुका विधी सेवा समिती व दिवाणी न्यायालय-मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयी जागरूकता उपक्रम अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कायद्यांची माहिती करून देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कायशाळेचे अध्यक्षस्थान जी.आर. तिवारी, अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती मुरूड व दिवाणी न्यायाधीश यांनी भूषविले. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशा



विविध कायद्यांची तोंडओळख करून देत सोबतच शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्याने कोणत्याही संस्थेतून शिक्षण घेऊन उच्चपदावर पोहचण्याचे ध्येय व चिकाटी स्वतःच्या मनात ठेवून नावलौकिक मिळवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे वकील बार असोसिएशन मुरूडचे सचिव ॲड. डी.एन. पाटील, सदस्य ॲड. इकरा शेखाणी, ॲड. एम.एम. सतविडकर यांच्यासह मुरूड न्यायालयातील लिपिक मतीन अधिकारी उपस्थित होते.

कार्यशाळेत ॲड. पाटील यांनी हुंडाबंदी कायदा, ॲड. शेखाणी यांनी परिवार व त्याचे संगोपन कायदा आणि ॲड. सतविडकर यांनी बालकांचे लैंगिक शोषण रोखण्याविषयी कायदा याची अत्यंत सोप्या भाषेत विविध कलमांची माहिती उपस्थित सर्वांना करून दिली.

या कार्यशाळेचे प्रास्तविक प्रा. शोएब खान यांनी व सूत्रसंचालन डॉ. स्वाती खराडे यांनी केले, तर प्राचार्य डॉ. शेख यांनी आभार व्यक्त केल्यावर राष्ट्रगीताने कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

# श्रीवर्धनमध्ये काजू उत्पादनावर भर

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील आंबा बागायतदारांनी गेल्या सहा ते सात वर्षांत काजू उत्पादनावर लक्ष केंद्रित करत विविध प्रयोग केले आहेत. तालुक्यातील योग्य हवामान आणि मातीच्या गुणवत्तेमुळे काजूची लागवड वाढविण्यासाठी एक अनुकूल वातावरण तयार झाला आहे. वेंगुर्ला ४ आणि वेंगुर्ला ७ या काजू जातींच्या मोठ्या प्रमाणात लागवडीमुळे काजू उत्पादनात वाढ झाली आहे.

श्रीवर्धन तालुक्यात आंबा लागवडीचे एकूण क्षेत्रफळ हेक्टरी २८७०, तर काजू लागवडीचे क्षेत्रफळ हेक्टरी ६४५ इतके आहे. आंबा आणि काजू ही दोन्ही वर्षावर्गीय पिके असले तरी काजूचे उत्पादन दरवर्षी होत असल्याने आंबा उत्पादकांची काजूच्या उत्पादनाकडे वळण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. विशेषतः वेंगुर्ला ७ आणि वेंगुर्ला ४ या दोन जातींना बाजारात अधिक मागणी आहे, कारण वेंगुर्ला ७ जातीत काजू मोठ्या आकाराचे येतात, ज्यामुळे त्याला अधिक आर्थिक लाभ होतो.

काजू लागवडीसाठी शासनाने फळबाग लागवड योजना व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत अनुदान प्रदान केले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील बागायतदारांनी या योजनांचा लाभ घेऊन काजू उत्पादनाला गती दिली आहे

> **श्रीवर्धन तालुक्यात काजू लागवडीला प्रोत्साहन मिळाल्याने बागायतदारांना अधिक आर्थिक फायदे होत आहेत आणि काजू उद्योगाला नवा आकार मिळत आहे.**
> **-श्रद्धा डुंबरे,**
> **श्रीवर्धन तालुका कृषी अधिकारी**

तसेच काजू उत्पादनासोबतच स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, ज्यामुळे काजू फळांवर प्रक्रिया करणारे लघुउद्योग सुरू झाले आहेत.



# समपहरण मालमत्तेचा २३ डिसेंबरला लिलाव

**रायगड : रामप्रहर वृत्त**


मे.इझिनॉक्स स्टिल्स लि. तर्फे डायरेक्टर सुधीर गुप्ता, रा. आनंदवाडी-सावरोली, ता. खालापूर यांच्याकडून येणे असलेल्या जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी विनिर्दिष्टी केलेल्या मालमत्तेचे समपहरण करण्यात आले आहे.

विक्रीसाठी यामध्ये निश्चित केलेल्या दिवसापूर्वी तलाठी सजा सावरोली यांना देय रक्कम दिली नसेल तर उक्त मालमत्ता तिच्यावर बसविण्यात आलेल्या सर्व भारापासून व तिच्या संबंधात करण्यात आलेली सर्व अनुदाने व संविदा यांपासून मुक्त, अशी मालमत्ता तहसील कार्यालय, खालापूर येथे २३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता किंवा वाजण्याच्या सुमारास, जाहीर लिलावाव्दारे विकण्यात येणार आहे, असे तहसीलदार अभय चव्हाण यांनी कळविले आहे.

# कोंढवी आणि कोतवाल येथील जीर्ण पुनर्वसन संकुलांना डागडुजीची प्रतीक्षा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील कोंढवी आणि कोतवाल येथे सिद्धिविनायक ट्रस्टच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या पुनर्वसन संकुलाचा ताबा दरडग्रस्तांना लॉटरीद्वारे देण्यात आला आहे, मात्र मदतीचे योग्य विनियोग न झाल्याने पोलादपूर तालुका पुनर्वसनास वंचित राहिला आहे. सध्या जीर्णावस्थेत असलेल्या दोन्ही पुनर्वसन संकुलांच्या इमारती पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत उभ्या आहेत.



**७७ लाखांचा प्रस्ताव**

अलिकडेच रायगडच्या पुनर्वसन उपजिल्हाधिकारी यांनी कोतवाल आणि कोंढवी येथील पुनर्वसनासंदर्भात १० फेब्रुवारी २०१९ रोजी भेट दिली असता त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार कोंढवी येथे २६ लाख ९९ हजार १९८ रुपये, तर कोतवाल येथे ४९ लाख ९५ हजार ८९६ असे एकूण ७६ लाख ९५ हजार ९४ रुपये पुनर्वसन कामी प्रस्तावित केले आहेत.

२५ व २६ जुलै २००५च्या अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खलनानंतर पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुकमध्ये सहा, कोतवाल खुर्दमध्ये तीन आणि लोहारमाळ-पवारवाडीमध्ये दोन जणांचा जमिनीत गाडले गेल्याने मृत्यू झाला. याखेरिज तालुक्यातील कोंढवी येथेही मोठया प्रमाणात भूस्खलन झाल्याने कोतवालसह कोंढवीमधील दरडग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे आव्हान निर्माण झाले. पुनर्वसनाच्या पहिल्या टप्प्यात पोलादपूर तालुक्यातील बोरावळे येथील नऊ घरांच्या बांधकामानंतर तेथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाले. सावित्री महिला विकास संस्थेतर्फे पैठण गावात तीन, देवपूर येथे चार, पार्ले तीन, माटवण पाच, जोगेश्वरी गाडीतळ तीन, सडवली सहा, लोहारमाळ चार, रानबाजिरे २३, आड दोन, सवाद एक आणि हावरे येथे सह अशी एकूण ६१ घरकुले बांधण्यात येऊन ताबाही देण्यात आला. पोलादपूर येथील चित्रे यांना घरबांधणीसाठी सरकारी अनुदान देण्यात आले.

याखेरिज, कोतवाल खुर्द आणि बुद्रुकच्या दरडग्रस्तांसाठी २८ घरकुले उभी राहतील एवढे क्षेत्र, तर कोंढवी येथे २९ घरकुले उभी राहतील एवढे क्षेत्र उपलब्ध करण्यात येऊन पुनर्वसनाचे प्रयत्न सरकारकडून सुरू झाले. सिद्धिविनायक ट्रस्ट मुंबईने याकामी खर्चाची जबाबदारी उचलली. कोतवालमध्ये दरडग्रस्तांची संख्या ४८, तर कोंढवी येथे ७८ कुटूंबे अशी असताना दोन्ही ठिकाणी प्रत्येकी ४५ लाख रुपये खर्चातून केवळ १५-१५ घरकुले उभारण्यात आली. गेल्या तीन-चार वर्षांत कोतवाल येथे घरकुलांपर्यंत जाणारा रस्त्यासाठी भूसंपादन करण्याकामी प्रशासनाने केलेली कुचराई तत्कालीन रायगड जिल्हाधिकारी सुभाष सोनावणे यांनी सिद्धिविनायक ट्रस्टचे विश्वस्त सुभाष मयेकर यांच्या हस्ते ५० लाखांचा धनादेश प्रदान करतेवेळी नाराजीसह उघड केली, मात्र त्यानंतर कोंढवी आणि कोतवाल येथील घरकुलांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होण्याऐवजी ती दिवसेंदिवस खालावत गेली.

कोंढवी येथे बांधण्यात आलेल्या पुनर्वसन घरकुलांचा १५ दरडग्रस्तांना लॉटरी पद्धतीने ताबा देण्यात आला. यापैकी पाच जणांनी घरकुलांचा ताबा घेतल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. यापैकी चार जणांनी गृहप्रवेश केला. एकच दरडग्रस्त काहीकाळ वास्तव्यास होता, तर अन्य लोक दरडप्रवण क्षेत्रातून स्थलांतरीत झाले नाहीत.

कोंढवी येथे पुनर्वसन घरकुलाची किंमत ४९ लाख ४९ हजार ६५१ रुपये एवढी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कोंढवी आणि कोतवाल या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी २१ घरकुलांची प्रशासकीय मान्यतेनुसार मंजूरी असताना केवळ प्रत्येकी १५ घरकुले बांधण्यात आली आहेत. यातही कोंढवीतील घरकुले बांधण्यात आलेल्या जागेचा वाद उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने नजिकच्या काळात तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. उर्वरित पात्र दरडग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी ७५ लाखांचा प्रस्ताव मदत आणि पुनर्वसन विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

# पळसदरी येथे श्रमसंस्कार शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पुण्यभूमी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पळसदरी येथील श्री समर्थ मठ परिसरात नेरळ विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्गत श्रमसंस्कार शिबिराला सुरुवात झाली.

विद्या मंदिर मंडळ माहिम, मुंबई संचालित नेरळ विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्गत हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांचा ध्यास-गाव, शहर, स्वच्छ भारत व्यक्तिमत्त्व विकास या संकल्पनेवर आधारित या शिबिराच्या पहिल्या दिवशी श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान



राबविले. या वेळी संस्थेचे संयुक्त सचिव विवेक पोतदार आणि स्थानिक ग्रामपंचायत ग्रामसेवक अनिल राठोड आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे विश्वस्त डॉ. मिलिंद पोतदार, ॲड. सचिन दरेकर, राजमाता जिजाऊ फाउंडेशनच्या अध्यक्ष ॲड. पूजा सुर्वे, माजी ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र दरेकर, विक्रांत दरेकर, मठसेवक धनंजय दरेकर आदी उपस्थित होते.

प्राचार्य प्रमोद विचवे, पर्यवेक्षक गिरासे, कार्यक्रम अधिकारी प्रा. वैशाली पाटील, प्रा. बी.एस. पाटील, प्रा. जी.के. काळण, प्रा. एच.आर. भगत, झुगरे यांनी श्रमसंस्कार शिबिराचे नियोजन केले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पाटील यांनी केले. उद्‌घाटनानंतर विद्यार्थ्यांनी श्री स्वामी समर्थ मठाच्या परिसराची स्वच्छता केली आणि मठाच्या सेवेचा अनुभव घेतला.

# भगवद्‌गीता पाठांतर स्पर्धेत नचिकेत ताम्हणकर, ईश्वरी पाठक प्रथम

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली ब्राह्मण सभेच्या वतीने गीता जयंतीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भगवद्‌गीता पाठांतर स्पर्धेत जनता विद्यालयाच्या नचिकेत ताम्हणकर याने चौथी ते आठवी या गटात, तर नववी ते बारावी या गटात व्हीडीएम स्कूलची ईश्वरी पाठक हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

चौथी ते आठवी गटात श्रेयस विनोद चौगुले कारमेल स्कूल याने द्वितीय, शब्दा सतीश पंडित व समृद्धी मंगेश येरम शिशु मंदिर दोघींनीही तृतीय क्रमांक मिळवला; तर नववी ते बारावी गटात परेश अविनाश पाठक व्हीडीएमस्कूल द्वितीय आला.

स्पर्धेसाठी पंधरावा अध्याय ठेवण्यात आला होता. अध्यक्ष राजेंद्र पेठे यांनी प्रास्ताविक केले. वेदा साखरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. माधवी केळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. राजश्री सरदेशपांडे व कीर्ती कुलकर्णी यांनी गीतेची आरती म्हटल्यानंतर स्पर्धेची सांगता झाली.

या वेळी संस्थेच्या उपाध्यक्ष सपना पित्रे, माजी अध्यक्ष नरेंद्र हर्डीकर, अनिल रानडे, व्यवस्थापक धनंजय मराठे, विनया हर्डीकर, खजिनदार सुधाकर भट, शशिकांत पाटणकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला.

# तिसऱ्या कसोटीवर पावसाचे सावट

## मालिकेत आघाडीसाठी भारत-ऑस्ट्रेलियामध्ये चुरस

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतील तिसरा सामना शनिवार (दि. १४)पासून ब्रिस्बेन येथील गाबा मैदानावर खेळवला जाणार आहे. हा सामना जिंकून दोन्ही संघांच्या नजरा मालिकेत आघाडी मिळवण्यावर असतील, मात्र तिसऱ्या कसोटी सामन्यात पाऊस व्यत्यय घालणार असल्याची चिन्हे आहेत.



भारताने पर्थमध्ये खेळला गेलेला पहिला सामना २९५ धावांनी जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली, मात्र ॲडलेडमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या डे-नाईट कसोटीत ऑस्ट्रेलियाने दमदार पुनरागमन करत भारताचा १० गडी राखून पराभव करत मालिकेत १-१ अशी बरोबरी मिळवली.

आता मोठा प्रश्न हा आहे की जर पावसामुळे गाबा कसोटी अनिर्णित राहिली तर त्याचा भारताच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) फायनलच्या शर्यतीवर काय परिणाम होईल. भारतीय संघ सध्या ५७.२९ टक्के गुणांसह डब्ल्यूटीसी गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. भारताच्या पुढे दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया आहेत, ज्यांचे गुण अनुक्रमे ६३.३३ आणि ६०.७१ टक्के आहेत. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसरी कसोटी अनिर्णित राहिली तरीही भारत डब्ल्यूटीसी फायनलमध्ये पोहचू शकतो. गाबा कसोटी अनिर्णित राहिल्यानंतर भारताने पुढील दोन सामने जिंकून मालिका ३-१ने जिंकल्यास त्यांना अंतिम फेरीचे थेट तिकीट मिळेल.

गाबा कसोटी अनिर्णित राहिल्यानंतर, भारताने पुढील दोन सामन्यांपैकी एक सामना जिंकला आणि एक गमावला तर मालिका २-२ अशी संपेल. या स्थितीत टीम इंडियाला श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मालिकेच्या निकालावर अवलंबून राहावे लागणार आहे. श्रीलंकेच्या संघाने ती मालिका १-० किंवा २-०ने जिंकावी अशी भारताला प्रार्थना करावी लागेल.

हवामानाच्या अंदाजानुसार सामन्याच्या पहिल्या दिवशी जास्तीत जास्त ८८ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर दुसऱ्या आणि चौथ्या दिवशीही पावसाची ४० टक्क्यांहून अधिक शक्यता आहे. उर्वरित तिसऱ्या आणि पाचव्या दिवशी सुमारे २० टक्के पाऊस पडू शकतो, ज्याचा खेळावर फारसा परिणाम होणार नाही.

# सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत मुंबईची फायनलमध्ये धडक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत बडोद्याचा सामना मुंबईशी झाला. अजिंक्य रहाणेची झंझावाती खेळी (९८ धावा) आणि कर्णधार श्रेयस अय्यरची छोटेखानी उत्कृष्ट फलंदाजीच्या जोरावर मुंबई संघाने हा सामना जिंकून अंतिम फेरी गाठली. रहाणेला त्याच्या उत्कृष्ट फलंदाजीसाठी सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

या सामन्यात मुंबई संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हार्दिक पांड्याचा समावेश असलेल्या बडोद्याने प्रथम खेळताना निर्धारित २० षटकांत सात बाद १५८ धावा केल्या. प्रत्युत्तरात मुंबई संघाने १७.२ षटकांत चार गडी गमावत १६४ धावा केल्या आणि सामना सहा गडी राखून जिंकला.

### अजिंक्य रहाणेची झंझावाती खेळी



अजिंक्य रहाणेने बडोद्याविरुद्ध मुंबईसाठी तडाखेबाज खेळी केली. त्याने अवघ्या ५६ चेंडूत पाच षटकार आणि ११ चौकारांच्या मदतीने ९८ धावा केल्या. या सामन्यात रहाणे आपले शतक पूर्ण करण्यापासून अवघ्या दोन धावा दूर होता आणि मुंबईलाही विजयासाठी दोन धावा करायच्या होत्या. त्याच वेळी अभिमन्यू सिंगने एक चेंडू वाईड टाकला. यानंतर रहाणेने मोठा फटका मारून शतक पूर्ण करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो झेलबाद झाला. मुंबईकडून कर्णधार श्रेयस अय्यरने ३० चेंडूत ४६ धावांची दमदार खेळी केली. सूर्यकुमार यादव मात्र अवघ्या एक धावेवर बाद झाला.

बडोद्याने पहिल्या डावात फलंदाजी केली, मात्र हार्दिक पांड्या छाप पाडू शकला नाही. अवघ्या पाच धावा करून तो बाद झाला. कर्णधार कृणाल पांड्याही चांगली कामगिरी करू शकला नाही आणि तो ३० धावा करून बाद झाला. संघाची दीडशेपार मजल विजयासाठी तोकडी पडली.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचे कुस्ती स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठांतर्गत शेठ हिराचंद मुठा महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कुस्ती स्पर्धेत यश मिळवले आहे.

महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातील तृतीय वर्षाच्या मेघना गांधी हिने रौप्यपदक, तर वाणिज्य विभागातील प्रथम वर्षाच्या सानिया शेख व भावना सिंग यांनी कांस्यपदक पटकाविले आहे. त्यांना महाविद्यालयातील जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर व फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्यकारी मंडळाचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# आशिष गौतमची राष्ट्रीय खो-खो संघात निवड

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय डॉ. आंबेडकर नगर नवी मुंबई येथील इयत्ता नववीतील खेळाडू आशिष गौतम याची अयोध्या येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी मुलांच्या १७ वर्षाखालील महाराष्ट्र राज्य खो-खो संघात निवड झाली आहे.

याबद्दल नवी मुंबईचे माजी महापौर सुधाकर सोनवणे, रंजना सोनवणे, आयुक्त कैलास शिंदे, उपायुक्त संघरत्ना खिलारे, शिक्षणाधिकारी अरुणा यादव, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव यांनी आशिषचे अभिनंदन व कौतुक केले आहे.



महाराष्ट्र संघाचा कॅम्प १२ ते १८ डिसेंबरदरम्यान सांगली जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी होऊन तिथूनच संघ अयोध्येच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निघणार आहे. कॅम्प व स्पर्धेसाठी मुख्याध्यापक अमोल खरसंबळे, क्रीडा शिक्षक अमोलकुमार वाघमारे, शिक्षक विनोद झापडे, रिंकी कुशवाह, मीना सुतार, सोनी यादव यांनी तुळशीचे रोप देऊन आशिषला शुभेच्छा दिल्या व सुयश चिंतले.

यापूर्वी १४ वर्षाखालील गटात आशिषने संघाला मिळवून देत स्वतःसाठी मानाचा भरत पुरस्कारही दोन वर्षांपूर्वी प्राप्त केला आहे. एक सर्वोत्तम खेळाडू म्हणून ज्या कौशल्यांची आवश्यकता आहे ती आक्रमकता व संरक्षकता त्याने कोच प्रताप शेलार, स्वप्नील पाटील, महेश शिंदे, अमोलकुमार वाघमारे, दिनेश भोये या मार्गदर्शकांकडून शिकून घेतली आहेत तसेच त्याने विहंग क्रीडा मंडळ, शाहू महाराज विद्यालय व नवी मुंबई महापालिकेचे नाव खो-खो क्षेत्रात उंचावले आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याची माहिती शाळेचे क्रीडा शिक्षक अमोलकुमार वाघमारे यांनी दिली.

# खेलो मास्टर्स गेम्समध्ये गजानन डुकरे यांची पदकांची हॅट्ट्रिक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील ज्येष्ठ वकील आणि आपल्या शरीरयष्टीने अनेक स्पर्धा विक्रम करणारे गजानन पालू डुकरे यांनी राज्यस्तरीय खेलो मास्टर्स गेम्समध्ये तीन पदकांना गवसणी घातली. वयाच्या ४९व्या वर्षी त्यांनी तीन पदके मिळवून राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपली निवड नक्की केली आहे.



कर्जत येथील दिवाणी न्यायालयात ॲड. डुकरे हे जागतिक विक्रम करणारे सायकलपटू असून त्यांच्या नावावर सायकल चालविण्याचे अनेक विक्रम आहेत. त्यांनी नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय मास्टर्स गेममध्ये सहभाग घेत हातोडाफेकमध्ये प्रथम, थाळीफेकमध्ये दुसरा आणि गोळाफेकमध्ये तिसरा क्रमांक पटकावला. या तिन्ही स्पर्धांमध्ये त्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com